नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

# निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपेकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.**

**सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.**

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

# युगवाणी



डिसेंबर १९७७ – जानेवारी १९७८

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

बाल नाट्यस्पर्धा -- पारितोषिक वितरण समारंभ.

*



कै. न्या. मू. रानडे, आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

‘ महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ ’ पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

# युगवाणी

डिसेंबर १९७७
जानेवारी १९७८
मार्गशीर्ष-पौष १८९९

संपादक :
वि. बा. प्रभुदेसाई

सहसंपादक
शिरीष गोपाळ देशपांडे

मूल्य तीन रुपये ) ( वर्ष ३३, अंक ९-१०

संदर्भ ग्रंथालय

## कवी ‘अनिल’ यांना साहित्य अकादमीचे पारितोषिक

कविवर्य ‘अनिल’ उपाख्य श्री. आत्माराम रावजी देशपांडे यांना यंदाचे साहित्य अकादमीचे मराठी वाङ्मयासाठीचे पारितोषिक देण्यात आल्यामुळे त्यांच्या साहित्यसेवेचा अत्यंत उचित असा गौरव झालेला आहे. ज्या ‘दशपदी’ या काव्यसंग्रहाला हा सन्मान लाभला त्याची वैशिष्ट्य विशद करणारा श्री. अक्षयकुमार काळे यांचा लेख आम्ही या अंकात मुद्दाम प्रसिद्ध करीत आहो. आधुनिक मराठी काव्याने अनेक वळणे घेतली असली तरी कवी ‘अनिल’ हे आपल्या नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेमुळे काव्यक्षेत्रात चिरतरुणच राहिले आहेत हे त्यांच्या ‘दशपदी’ने सिद्ध केले आहे. ‘नेहरु साक्षरता पुरस्कारा’पाठोपाठ लगेच साहित्य अकादमीचे पारितोषिक संपादन करणाऱ्या आप्पासाहेबांना आमचे विनम्र अभिवादन.

## ‘गीतरामायण’कार ग. दि. माडगूळकर वैकुंठवासी झाले !

‘गीतरामायणा’मुळे ज्यांचे नाव अखिल महाराष्ट्रात सर्वतोमुखी झाले असे मराठीतील नामवंत साहित्यिक श्री. ग. दि. माडगूळकर यांचे पुणे येथे दिनांक १४–१२–१९७७ रोजी अकाली निधन झाल्यामुळे महाराष्ट्रातील रसिक अंतःकरणापासून हळहळत आहेत. प्रा. वा. ल. कुळकर्णी यांच्या समर्पक शब्दांत वर्णन करावयाचे झाल्यास, “गीतरामायणाने सर्वतोमुखी झालेले एक श्रेष्ठ दर्जाचे कवी, अस्सल मराठी जीवनाची अनुभवचित्रे रेखाटणारे कथाकार, मराठी बोलपटाचे सौंदर्य आपल्या कथा-संवाद-लेखनाने व गीतरचनेने शतगुणित करणारे कलावंत, मराठी भाषेचे मराठमोळे वळण अभंग राखणारे शैलीकार या अनेक नात्यांनी उभा महाराष्ट्र गदिमांना ओळखतो.”

श्री. माडगूळकर हे विदर्भातील यवतमाळ येथे भरलेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. विदर्भात महारोगी सेवा समितीच्या आनंदवनात श्री. बाबासाहेब आमटे व सौ. साधना आमटे यांनी दिनांक १७ व १८ डिसेंबर, १९७७ रोजी आयोजित केलेल्या ‘आनंदवन मित्र मेळाव्या’च्या निमित्ताने श्री. माडगूळकर यांनी रचिलेली एक कविता आम्ही याच अंकात ऋणनिर्देशपूर्वक देत आहो. कदाचित् ‘गदिमां’ची ही अखेरचीच काव्यनिर्मिती असेल ! कै. ग. दि. माडगूळकर यांच्या पावन स्मृतीला विदर्भ साहित्य संघाची विनम्र आदरांजली.

## अंतरंग

दोन कथा :— वसंत वरखेडकर, मी एक मोझेझ २०१; योगेन्द्र मेश्राम, तो कधी हसला नाही ! २०९;

दोन लेख :— द. प. इंगोले, कविवर्य भा. रा. तांबे यांच्या काव्यातील सामाजिकता २०७; वि. बा. प्रभुदेसाई, मराठीच्या व्याकरणातील ‘प्रथमा’ व ‘संबोधन’ २१७;

दोन ग्रंथपरीक्षणे :— अक्षयकुमार काळे, दशपदी २१५; श्री. रा. सिरास, ग. त्र्यं. माडखोलकर व माडखोलकरविषयक : दोन पुस्तके २१९;

तीन कविता :— माडगुळकरांची शेवटची कविता २३०; सतीश काळसेकर, पांगारा २३०; वि. त्र्यं. देशपांडे, राखेची फुले २३०; कार्यवृत्त, साभारपोच वगैरे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

## ॥ प्रसिद्ध झाली ॥

**जहाज**
कथासंग्रह :
**बाळकृष्ण वि. प्रभुदेसाई रु. १५.००**

**कांटची सौंदर्यमीमांसा**
समीक्षा **रा. भा. पाटणकर रु. ३०.००**

**यातनाघर**
एकांकिकासंग्रह :
**महेश एलकुंचवार रु. ११.५०**

**मानसी**
कवितासंग्रह **वसंत बापट रु. ५.००**

## ॥ छापत आहेत ॥

**ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र**
समीक्षा : नवी आवृत्ती : **गो. वि. करंदीकर**

**रापण**
आत्मवृत्त **प्रल्हाद अनंत धोंड**

**डॉ. पटवर्धन**
**ऊर्फ माधव जूलियन**
चरित्र **व. न. गोखले**

**मातृका**
कादंबरी : **पुरुषोत्तम शिवराम रेगे**

**सलाम**
कवितासंग्रह **मंगेश पाडगावकर**

## ॥ आगामी पुस्तके ॥

### मौज प्रकाशने

**सौंदर्यानुभव**
समीक्षा **प्रभाकर पाध्ये**
(एस्थेटिक्स सोसायटी/मौज प्रकाशन)

**बिअरची सहा कॅन्स**
कथासंग्रह **नरेश**

**उच्छाद**
कादंबरी **त्र्यं. वि. सरदेशमुख**

**माती**
कादंबरी **वि. ज. बोरकर**

### पुनर्मुद्रणे

**कोंडुरा**
कादंबरी : **चिं. त्र्यं. खानोलकर**

**पाचोळा**
कादंबरी : **रा. रं. बोराडे**

### मौज वितरण

**वामन मल्हार आणि विचारसौंदर्य**
समीक्षा : **प्रभाकर पाध्ये**

**आतून बंद बेट**
कवितासंग्रह : **श्रीधर शनवारे**

॥ मौज प्रकाशन गृह ॥ खटाववाडी, मुंबई ४०० ००४

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

## वसंत वरखेडकर / **मी एक मोझेझ**

रामायण आणि महाभारत, इलियड आणि बायबल, तसंच फाऊस्ट या पंच महाकाव्यांचं मिळून माझं एक कल्पनाविश्व तयार होतं. तेच माझं भावविश्व बनतं सुखाचं आणि दुःखाचं दोहोंचं.

रामायण आणि महाभारत राजघराण्यांच्या कथा आहेत. मानव इथे मार्ग धुंडाळतो, मुक्तीचा. मुक्ती ? सर्वम् शून्यम् ! सर्वम् क्षणिकम् ! जग मिथ्या आहे म्हण की गुलाम ! ह्या कल्पना-विश्वातून मन उडून जातं. इलियड ? पुन्हा राजा-राजामधल्या हेव्यादाव्यांची, एकाची बायको दुसऱ्यानं पळविल्याची आणि म्हणून महायुद्ध घडल्याची एक रोमांचकारी कथा. पुन्हा मन उडून जातं. दूर. फाउस्टवर स्थिरावतं. मेफिस्टोफेलिस खरा आहे. आजही जिवंत आहे. तो लालूच दाखवितो आपण आपल्याला स्वतःला त्याच्याकडे गहाण टाकतो. आणि मग मेफिस्टोफेलिसचं राज्य येतं. आणिबाणीचं. माणूस गुलाम बनतो. नरकाप्रत ओढला जातो. पण किती वेळ रमायचं फाऊस्टच्या कल्पनाविश्वात. मग मी शिरतो बायबलच्या विश्वात. बदल हवा म्हणून. आणि मी एकरूप होतो. तादात्म्य पावतो. शासन विरुद्ध माणूस ! एक सनातन संघर्ष. आजही तितकाच उग्र असलेला. तिथे त्या विश्वात मला उतरावंसं वाटतं, माणूस म्हणून. झुंज घ्यावीशी वाटते, गुलामगिरीचा भोग मानवाच्या माथी मारणाऱ्या शासनाशी. तिथे देव स्वातंत्र्यसंपादनाच्या कार्यात माणसाची बाजू घेतो. तो माणसाला वाचवतो. वाटतं, मी बायबल लिहावं. त्यातल्या देवाला वगळून. देव आला की कथा सत्यकथा उरत नाही. म्हणून देव बाद. दैवी चमत्कार बाद.

आसुडांचे आवाज निनादतात. रक्ताळलेल्या पाठी दिसतात. कुणीतरी घामाने डबरेला माणूस पुकारतो, "मोझेझ". आणखी असेच केविलवाणे चेहेरे वर येतात. त्यांचीही तीच पुकार—"मोझेझ,—मोऽऽझेझ".

"तुम्ही मला हाक मारलीत ?" मी विचारतो. माझ्या प्रश्नाचं त्यांना आश्चर्य वाटतं. मीच विसरलो असेन ! पुष्कळदा विसरतो मी स्वतःला, मग मला सगळं आठवतं.—

फॅरोने मला बोलावलं होतं आणि म्हटलं होतं, "मोझेझ, तूं एक आर्किटेक्ट आहेस. इंजिनियर आहेस. नवं इजिप्त आपल्याला निर्माण करायचं आहे. अशा भव्य वास्तू आपल्याला निर्माण करायच्या आहेत की ज्या अनंत काल टिकून राहतील आणि ह्या राष्ट्राची निर्मितिगाथा उंच मानेने पुढे येणाऱ्या असंख्य पिढ्यांना अभिमानाने सांगत राहतील. आपलं राष्ट्र अमर होईल. मोझेझ लाग कामाला".

आणि मग मी एक सुंदर आराखडा तयार केला, इजिप्तच्या नव्यानिर्मितीचा. प्रचंड पिरॅमिड. प्रचंड शिल्पाकृती. भव्य पुतळे.

फॅरो म्हणायचा, "मोझेझ, जगात दोनच गोष्टींचं महत्व अत्याधिक आहे. त्या म्हणजे शिस्त आणि ऐक्य".

फॅरोचे शब्द माझ्या मनावर बिंबले होते. पण मी वक्ता नव्हतो. लेखक नव्हतो. ह्या गुणांचं महत्व इतरांना कसं पटवायच हा माझ्यापुढे प्रश्न होता. फॅरोला कळलं ते तो म्हणाला, "शासनाने पारितोषिके दिलेले लेखक आहेत आपल्या देशात त्यांची गुणवत्ता वादातीत आहे. हे काम त्यांना दे. वाटल्यास जो सर्वांत उत्तम काम करील त्याला आपण फार मोठा पुरस्कार देऊं या. इजिप्तरत्नं पुष्कळ झाले. आता एका साहित्यिकाला इजिप्तरत्न करायचं ठरवूं".

पटलं मला फॅरोचं म्हणणं. मुखम् पद्मदलाकारम् भाषा चंदनशीतला असा लौकिक असलेला एक लेखक माझ्या माहितीतला होता. त्याला बोलावलं आणि म्हटलं, "गुलामांकडून आपल्याला कामं घ्यायची



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहेत. त्यांच्यात शिस्त आणि ऐक्य ह्या गुणांची जोपासना केली पाहिजे. तुम्ही हे काम कराल का? फॅरोची इच्छा आहे की तुम्ही हे कार्य हाती घ्यावं".

"फॅरोची इच्छा की मी हे काम करावं ?" तो हर्षभराने किंचाळलाच. त्या सन्मानाने त्याला आकाश ठेंगणं झाल्यासारखं वाटत होतं. आणि त्याने ते काम हाती घेतलं. एक दिवस मी ध्यान देऊन त्याचं व्याख्यान ऐकत होतो. तो गुलामांना शिकवत होता —"तुम्ही करता आहात हे एक फार मोठं राष्ट्रकार्य आहे. तुम्ही आज आहात. उद्या मरून जाल. पण तुम्ही केलेली निर्मिती अमर राहील. अंगी शिस्त आणा. मग तुमचं काम किती चांगलं होतं आहे हे तुमचे तुम्हालाच दिसून येईल. सुंदर कामाचा आनंद अवर्णनीय असतो. तसंच एक माणूस म्हणजे शून्य व सर्व माणसं म्हणजे प्रचंड शक्ती हे गणित कधी विसरू नका. ऐक्याचं सामर्थ्य अफाट असतं. एक काडी मोडते. काड्यांचा गठ्ठा मोडणं अशक्य होतं".

गुलामांच्या चेहऱ्यावर फारसा आनंद दिसला नाही. काहींनी आपल्या पाठी लेखक वक्त्याकडे वळविल्या. त्याला वाटलं, गुलामांनी मुद्दाम वळवल्या पाठी आपल्याकडं. त्यावर रक्ताळलेले वळ उमटलेले होते. शिस्तीची लिपी गोंदवली गेली होती तेथे.

लेखक वक्ता म्हणाला, "शिस्त आपणच आपल्याला लावून घ्यावी. आणि आपल्या पाठीवर कोरडे ओढण्याचा प्रसंग दुसऱ्यावर आणूच नये हे सर्वांत उत्तम. हौस म्हणून कुणी कुणाच्या पाठीवर कोरडे ओढीत नसते. राष्ट्रकार्यासाठी हे अत्यावश्यक ठरतं. सर्व शिस्तीत, स्वतःच स्वतःला लावून घेतलेली शिस्त सर्वोत्तम. मी तुमचं कल्याण इच्छितो. जय जगत, जय मानव. जय देव. जय इजिप्त. फॅरो इजिप्त आहे. जय फॅरो".

फॅरो त्या लेखकावर खूश होता. त्याला मोठा पुरस्कार देण्याचा, इजिप्तरत्न करण्याचा विचारही फॅरोने बोलून दाखविला. माझ्या डोळ्यांपुढून गुलामांच्या पाठीवर उमटलेले रक्ताळलेले वळ काही मिटत नव्हते. तरीही अद्याप वाटत होतं,— फॅरोचं म्हणणं बरोबर आहे ! गुलाम शिस्त आणि ऐक्य आचरणार नसतील तर मी आर्किटेक्ट म्हणून, इंजिनियर म्हणून काय करू शकणार आहे ? आणि देशाचं नाव तरी कसे उजळ होणार आहे ?

शंभर टन वजनाचा गोलाकार दगडी खांब मागे दंड लावून हजार गुलाम पुढं रेटीत होते. तसू तसू तो पुढे घरंगळत होता. कुणा एका कामकरी बाईची निरी गेली त्याच्याखाली आणि ती ओढली जाऊ लागली. त्या प्रचंड शिलाखंडाखाली. लवकरच ती चिरडली जाणार. कुणी धावाधाव केली. मुकादमांना विनवलं. ते ऐकेनात. शिस्तीचा धाक होता त्यांनाही. त्या स्त्रीचा भाऊ माझ्याकडे आला. विनवू लागला. "मोझेझ, थांबवा हा रेटा क्षणभर. नाहीतर माझी बहीण चिरडली जाईल".

मी गेलो. काम थांबवलं. बाईची सुटका केली. आणि मग एका व्यापक विचारावर आमची मनं केंद्रित झाली. माझ्या सहकारी आर्किटेक्ट इंजिनियरने तेवढ्या काळात किती माणूस-तास वाया गेले त्याचाही हिशेब केला. आणि हे कशासाठी ? तर एक क्षुद्र जीव वाचविण्यासाठी !

व्यथित अंतःकरणांन मी धर्मगुरूकडे गेलो. विचारलं, "माझं कुठे चुकलं का ?"

तो म्हणाला, होय, आपण सारे देवाचे गुलाम आहोत ही सारी निर्मिती देवाची इच्छा म्हणून आपण करतो आहोत. मरणम् प्रकृतिः शरीरिणाम्! ती स्त्री आज वाचली. उद्या मरेल. पण तू निर्मिति कार्यात खंड पाडलास. हा देवाच्या दृष्टीने प्रमाद होय. असो. देव तुला उदार अंतःकरणाने क्षमा करील. मी तुझ्यावतीने देवाची क्षमायाचना करेन."

"ती स्त्री गुलाम होती म्हणून तिचा जीव क्षुद्र ना ?" मी धर्मगुरूला विचारलं.

तो म्हणाला, "आपण सारे देवाचे गुलाम. हे कामगार आपले गुलाम. पर्यायाने देवाचेच गुलाम. कुणीकुणाला मारत नाही. कुणी मरतो हेही खरे नाही. जो देवकार्य करतो तो अंती देवाकडे जातो. देवकार्य आणि देशकार्य दोन्ही एकच आहेत."



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तरीही शंकाकुल मनानं धर्मगुरूला विचारलं, "म्हणजे आपण देवाचे गुलाम. आणि हे गुलाम आपले गुलाम. आपण उच्च वर्णीय गुलाम आणि हे शूद्र गुलाम. आपण देवाचे लाडके गुलाम. आणि हे देवाचे नावडते गुलाम. असेच ना ?"

धर्मगुरू म्हणाला, "आपण सारीच ईश्वराची लेकरे आहांत. देवापुढे आपण सर्वच समान आहांत. उच्च नीच हे भेद आपले आपल्यापुरते. देवास प्रिय तो, जो देवकार्य उत्तम करील."

माझं देवकार्य, देशकार्य चाललंच होतं. आणि मग मला आणि फॅरोला, दोघांनाही एकदमच कळलं की मी जन्मजात गुलाम आहे. फॅरो म्हणाला, "तुझं मन गुलामाकडे धाव का घ्यायचं ह्याचं कोडं आता उलगडलं आहे. मोझेझ, तुझ्यात गुलामाचं रक्त आहे. म्हणून तुझी धाव त्यांच्याकडे असायची. आता तुझं तूच ठरव. आमच्यात राहायचं आणि नवनिर्मितीचं राष्ट्रकार्य करायचं की गुलामांत जाऊन त्यांच्यासारखं राहायचं. अर्धवटपणा नको. कुठलाही एक निर्णय घे."

आणि मी गुलामांत गेलो. गुलामांचा भोगवटा उचलला. पाठीवर आसुडाचा पहिला फटकारा बसला तेव्हा रक्त सळसळून उठलं. ओरडलं. बंड पुकारू लागलं. शेजारच्या गुलामांना विचारलं, "हा आपला भयंकर अपमान आहे असे तुम्हाला वाटलं होतं का ? तुमच रक्त कधी सळसळलं होतं कां ? बंड करून उठलं होतं का ?"

साऱ्यांनी एकदम माना टवकारल्या. एकजण म्हणाला, "मोझेझ, आसुडाचा प्रत्येक तडाखा झेलताना हे असंच होत असतं. बरं झालं तुला आज हा अनुभव आला. अनुभवासारखा गुरु नाही. तूच पाठविलं होतंस ना पूर्वी एका लब्धप्रतिष्ठित साहित्यिक-वक्त्याला, शिस्त आणि ऐक्य यांवर प्रवचन झोडायला ? आता कळलं असेल त्या गुणांतलं मर्म. शिस्तीवर प्रवचनं झोडणाऱ्यांना हा शिस्तीचा अनुभव चाखायला दिला पाहिजे."

"धर्मगुरू म्हणाले होते –" मी पुढे बोलू लागलो. मधेच तोडून तो म्हणाला, "त्यांची गोष्ट सोड मोझेझ. तिथले सर्व नीतिदंड इथे गुलामांच्या जगतात, शून्य किंमतीचे आहेत".

"अहिंसा, सत्य, अस्तेय, शौचम्, इंद्रियनिग्रहम् ?"

"होय तेही"

"मग तुमचा धर्म कोणता ?"

"बंडाचा"

"नीतिसंकेत ?"

"बंडाशी सुसंगत ठरतील ते".

"मोझेझ तुमचा धर्म स्वीकारील". मी त्या वयोवृद्ध गुलामाला अभिवचन दिलं.

आणि मग माणूस म्हणून मी शासनाविरुद्ध बंडाचा बावटा उभा केला. फॅरोने मला बोलावलं. म्हणाला, "मोझेझ, तुझ्या जागी दुसरा कुणी असता तर मी त्याला तावडतोब ठार केला असता. तुला मी हद्दपार करतो. पण हे लक्षात ठेव. परदेशात जाऊन स्वदेशाची बदनामी करू नकोस. देशद्रोहासारखे भयंकर पाप नाही".

फॅरोच्या दूतांनी मला सीमेच्या पुष्कळ पलीकडे नेऊन विदा केलं. एका नामवंत आर्किटेक्ट इंजिनियरचं, देशाच्या स्थापत्य प्रमुखाचं, असं नष्टचर्य ओढवावं ह्याचं त्यांना दुःख होतं. एकाने माझ्या खांद्यावर घोंगडं टाकलं. म्हणाला, "वारा आहे, पाऊस आहे, थंडी आहे, येईल हे कामा".

दुसऱ्यानं हातीं एक दंड दिला. म्हणाला, "पुढे मुलुख आहे सापांचा. विंचवांचा. दंड उपयोगास येईल."

गेलो. पुष्कळ पुढे गेलो. पुष्कळ जमीन पायाखाली तुडवली. आणि अशाच एका चिमुकल्या



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वस्तीत पोहोचलो. हे जगच वेगळं होतं. इथे, आहे की नाही इतपत जेमतेम सरकार होतं. आणि म्हणून लोक रंजले गांजले नव्हते. निसर्ग पुरवील त्यावर त्यांचं पोट भरायचं. निसर्ग देईल ते ते ल्यायचे. चार दिवसांच्या निवासाला पुरेल अशी जुजबी घरं होती त्यांची. मुक्काम हलला की घर मिटलं. माझ्या देशातल्याप्रमाणे इथे प्रचंड वास्तू निर्माण करण्याची आकांक्षा कुणाच्या मनाला शिवली नव्हती. आणि म्हणून शासनाला गुलाम जोपासण्याची गरजही जाणवली नव्हती. प्रत्येक माणूस आपल्या जागीं राजा होता. प्रत्येक स्त्री आपल्या जागी राणी होती. एकीशी माझी गट्टी जमली. गप्पांचा ओघात मी तिला माझ्या देशीची गोष्ट सांगितली—

"आमचं शासन गुलामांना म्हणायचं की तुम्हाला भाकर हवी आहे ना, मग स्वातंत्र्याचं नाव काढू नका."

ती मुलगी अचंबा व्यक्त करीत विचारू लागली, "तुझ्या देशांत धान्य कोण पिकवतं?"

मी म्हणालों, 'गुलाम".

"म्हणजे गुलाम स्वतःचीच नव्हे तर शासनाची भाकर उत्पन्न करतात. मग, शासन म्हणतं ते खोटं आहे येवढंही तुझ्या देशातल्या गुलामांना कळत नाही? असे कसे रे बुद्धू तुझ्या देशीचे लोक?"

म्हणालो, "लोकांना कळतं ग. शासनाला कळत नाही."

अशा गप्पा रंगता रंगता आम्ही जवळ आलो. अधिक जवळ आलो. एक झालो. माझ्या देशी मी नामवंत आर्किटेक्ट-इंजिनिअर होतो. फॅरोचा लाडका होतो. आणि म्हणून थोरामोठयांच्या लाडक्या लेकी बापाजवळ हट्ट धरायच्या, "बाबा, मोझेझ मला हवा. इतर देतील त्याहून मोठा हुंडा तुम्ही द्या. आणि मोझेझला मिळवा." स्वतः राजकन्येचा माझ्यावर डोळा होता.

इथे हृया पोरीजवळ माझ्या कुठल्याच मोठेपणाची किंमत नव्हती. तिला विचारलं, "नवरा कसा हवा ग तुला?"

म्हणाली, "तुझ्यासारखा"

विचारलं, "आणि कशासाठी हवा ग?"

खुशीत येऊन म्हणाली, "हुबेहूब तुझ्यासारखी मुलं व्हावीत, हृयाकरिता." माझ्या देशी मुलींनी किती लांबलचक उत्तरं दिली असती! तिला मी मिळालो. आणि माझ्यापासून दोघं.

दिवस सुखात जायचा. रात्र त्याहून सुखात जायची. स्पर्धा होती ती सुख आणि अधिक सुख याच्यांत. एक दिवस ती भावडी पोर एकाएकी म्हणाली, "मोझेझ, तू सुखी नाहीस. तू काहीतरी शोधतो आहेस." ती ठावच घेत होती माझ्या नजरेचा.

मी उतरलो, "माझ्या लोकांना मी ज्या स्थितीत सोडून आलो आहे, ती मी विसरू शकत नाही शासन विरुद्ध माणूस. एक अनादी अनंत स्पर्धा. तीही सर्वस्वी विषम. सत्ता आणि मत्ता शासनाच्या ठायी एकवटलेली. माणूस दुप्पट गुलाम. फॅरोला देव आहे. फॅरोला धर्म आहे. गुलामांना देवही नाही, धर्मही नाही."

"मोझेझ" ती भावडी पोर म्हणाली, तू शोध ना गुलामांसाठी देव. तू दे ना गुलामांना धर्म."

मी उठलो. निघालो. तिने विचारलं, "कुठे निघालास?"

मी सांगितलं, "तूं म्हणतेस तिकडे. मिळालाच तर देव घेऊन जाईन गुलामांसाठी. नच मिळाला तर निदान स्वतः जाईन गुलामांसाठी. नच मिळाला तर निदान स्वतः त्यांना धर्म देईन."

भरल्या डोळ्यांनी तिने निरोप दिला.

देव मला शोधायचा नव्हता. मी तडक निघालो होतो फॅरोच्या राजधानीकडे. पण देवच माझ्या मागोमाग येत राहिला. त्रासून त्याला विचारले, "कशाला येतो आहेस माझ्या मागे मागे?"



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देव म्हणाला, "जन्म घ्यायला. एक जीवन जगायला."

विचारलं, "मी जन्म देणार आहे तुला ?"

देव म्हणाला, "हो. प्रत्येकजण आपल्याला हवा तसा देव स्वत: निर्माण करीत असतो. मोठे लोक मोठा देव निर्माण करतात. आणि महाकवींच्या प्रतिभेतून जगद्वंद्य देव निर्माण होत असतो. मोझेझ, तुझा आर्किटेक्ट-इजिनियरचा अवतार संपला. आता तू शासन विरुद्ध माणूस ह्या संघर्षाचं महाकाव्य उत्पन्न करणारा म्हणून पुढे निघाला आहेस. ह्या महाकाव्यातला देव म्हणून जन्म घेण्याची आकांक्षा आहे मला. मोझेझबरोबर एक जीवन मला जगायचं आहे."

मी बोललो नाही. एक सावली कधी माझ्यापुढे चालायची. कधी मागोमाग यायची. पण माणसाचं युद्ध माणसानं जिंकलं पाहिजे ही माझी जिद्द होती. सावलीची दखल मी घेत नव्हतो. फॅरोपुढे जाऊन उभा ठाकलो म्हणालो, "फॅरो, मनाचा निर्धार करून तुझ्याशी झुंज घ्यायला आलो आहे मी. माणसानं शासनाला हरवलं पाहिजे आणि आपलं स्वातंत्र्य घोषित केलं पाहिजे."

फॅरो म्हणाला, "तू अज्ञानाने ग्रस्त आहेस. फॅरो हा देवाचा अंश आहे. राजाचे अधिकार दैवी असतात. त्यांच्याविरुद्ध माणसाने बंड करणे हा देवाविरूद्धचा गुन्हा आहे. आहे का तुझी देवाविरुद्ध बंड करण्याची हिंमत ?"

मी उत्तरलो, "आहे. फॅरो, तू तुझा देव आणि तुझा धर्म, तिघांनाही माझं आव्हान आहे. स्वातंत्र्यासाठी नष्ट करायचं झालं तर मी तिघांनाही नष्ट करीन."

राजसभा थरारली. एका वयोवृद्धाने प्रश्न केला, "मोझेझ, तुझ्याजवळ फॅरोच्या देवाहून अधिक शक्तिमान देव आहे का? असेल तर ते सिद्ध कर. मग ह्या गोष्टी बोल."

"दंभाला देवाची जरूर भासते. मला नाही."

सारे दरबारी हसले.

फॅरोने ममतेने विचारले, "मोझेझ, सांग तुला काय हवंय ? तू माग मी देतो. राष्ट्रकार्याचा व्यापक विचार डोळ्यांपुढे ठेवून हा वाद एकदाचा मिटवून टाकू या."

मी विचारलं, "मी मागणारा ? आणि तू देणारा ? "होय. " फॅरो म्हणाला. "गुलामांनी मागायचं असतं. शासनानं द्यायचं असतं. देवाने प्रस्थापित केलेले नाते आहे हे."

"मागायला गुलाम आहेत हे विसर. शासन आणि गुलाम हे नातं उत्पन्न करणारा देवही गुंडाळून ठेव फॅरो. त्याची सद्दी संपली. देणारा तू कुणी नव्हंस."

"मी तुला आणि तुझ्या लोकांना भाकर देण्याचं अभिवचन देतो. राष्ट्रकार्यार्थ कष्ट करण्याचं तुम्ही मला अभिवचन द्या."

"आपली भाकर तर लोकच उत्पन्न करतात. तू ती देणारा कोण !"

"मोझेझ, वाद आता अधिक वाढवू नकोस. तूं गेल्यापासून इथल्या राष्ट्रकार्याची गती मंदावली आहे. स्वातंत्र्यच मागतो आहे ना तूं गुलामासाठी ? ठीक आहे. गुलामांसाठी आपण एक आचारसंहिता तयार करूं या. तेवढं तू मान्य कर. मग स्वातंत्र्यही देतो. गुलामांना आणि नागरिकांना आपल्या कर्तव्यांचं बंधन असावं, येवढंच फॅरोचे म्हणणं आहे."

"फॅरो, तुला स्वातंत्र्याचा अर्थच कळला नाही. जे एकजण दुसऱ्याला मेहरबानी म्हणून देतो ते स्वातंत्र्य नसतं. सौदा करून देतो तेही स्वातंत्र्य नसतं. स्वातंत्र्य ही एकानं द्यावं आणि दुसऱ्यानं घ्यावं अशी चीजच नाही. स्वातंत्र्याचा अपहार करणाऱ्या शासनाचं दमन करून स्वकर्तृत्वाने जिंकायची चीज आहे ती. माझ्या लोकांना सांगणार आहे हे मी. स्वातंत्र्य त्यांच्यासाठी असतं ज्यांच्यात ते संपादण्याची आणि राबविण्याची ताकद आहे".



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"शब्दांवर वाद घालतो आहेस तू मोझेझ. राष्ट्रकार्याचा विचार कर. मी गुलामांना स्वतंत्र नागरिक म्हणून घोषित करतो. मग तर झालं. राष्ट्रकार्याचा विचार करून तू नागरिकांसाठी आचारसंहिता कर. तेवढी त्यांनी मान्य केली की साराच वाद मिटतो आहे."

"फॅरो, राष्ट्रकार्य कशाला म्हणायचं ते लोक ठरवतील. तू नव्हे. कर्तव्यं काय आहेत हे नागरिक शासनाला सांगतील. आचारसंहिता शासनासाठी हवी. ती तू म्हणशील तर मी तुला तयार करून देतो."

"सारंच उफराटं बोलतो आहेस तू मोझझ. मी शास्ता आहे नागरिक शासित आहेत. येवढी साधी गोष्ट कळू नये तुला ?"

"नाही फॅरो. तू चुकतो आहेस. नागरिक म्हणजे पर्यायाने माणूस, आणि शासन ही कर्तव्यांनी बांधलेली, कायद्यांनी जखडली गेलेली लोकसेवा - यंत्रणा आहे."

आता फॅरोचा संयम सुटला. तो ओरडला, "हा शुद्ध धर्मद्रोह आहे. दैवी संकेतांचा जाणूनबुजून केलेला अपमान आहे. मोझेझ, तुझी गुलामांना चिथावणी आहे. ते आता पूर्वीप्रमाणे इमानेइतबारे काम करीत नाहीत. भांडण झगडे करतात. कधी कधी काम बंद करण्याची धमकी देतात. आणि ती अमलात आणण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. राष्ट्रकार्याची होत असलेली ही हानी फॅरो अशी उघडया डोळयांनी बघू शकणार नाही."

"त्यांनी करायला हवं तेच ते करताहेत."

"मग मीही करायला हवं ते करीन."

"करून पहा."

"मी म्हणेन तोच कायदा होतो. तोच कायदा असतो. माझ्याजवळ सैनिक आहेत आणि शिपाई आहेत. ह्याचीही आठवण असू दे मोझेझ."

"सैनिकांना आणि शिपायांना मी सांगेन, - तुम्ही लोकांच्या रक्षणासाठी आहात. त्यांचं पारिपत्य करण्यासाठी दमन करण्यासाठी नाही."

"ही राजद्रोहाची कमाल मर्यादा झाली. मोझेझ, आता, ज्याला तुम्ही सारे पात्र आहात तेच तुम्हांला मिळेल. चालता हो इथून."

सैनिकप्रमुख आणि शिपाईप्रमुख यांना समोर उभे करून फॅरो म्हणाला, "कायदा मी तुमच्या हाती देतो. ह्या साऱ्यांना सबक शिकवा. तुम्ही कुणाला ठार मारलं तरी त्याच्या वतीने कुणी दाद मागू शकणार नाही. जीवनावरचा माणसाचा हक्क इतःपर संपला. दाद मागायला आता कुठलंही न्यायालय उघडं राहणार नाही. कुणी फॅरोपर्यंत येऊ म्हणेल तर त्याला माझंही दार बंद."

फार दिवसांनी मी माझ्या लोकांत येत होतो. त्यांचे कणे ताठ झाले होते. माना उंचावल्या होत्या. नवचैतन्याने त्यांची मनं मुसमुसली होती.

एकाने मला विचारलं, "मोझेझ आणलास का आमच्यासाठी देव ?"

"आणला आहे," मी म्हणालो.

"कुठे आहे ?" त्याने विचारले.

"तुमच्यांत." मी उत्तरलों.

"काय नाव त्याचं ?"

"लोक."

"फॅरो करील का ह्या देवाची पूजा ?"

"त्याने ती करायला हवी." मी समारोप केला. दुसऱ्याने मला विचारलं, "आणलास का आमच्या साठी धर्म ?" (पृष्ठ २२१ वर पाहा)



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

## दत्तराम परशुराम इंगोले / कविवर्य भा. रा. तांबे यांच्या काव्यातील सामाजिकता

कविवर्य तांब्यांच्या कवितेचे एक अनन्यसाधारण वैशिष्टच असे की, त्यांच्या बहुसंख्यांक कविता जरी सांसारिक, प्रेमविषयक आणि काही किरकोळ आत्मनिष्ठ असल्या तरीही त्यांच्या काही कवितांतील सामाजिक आशय हा उपेक्षिता येणार नाही इतपत लक्षवेधी उतरलेला आहे, यात शंका नाही.

तांब्यांनी १९२७ साली लिहिलेली 'तृणाचे पाते' ही कविता सामाजिक जाणीवेच्या दृष्टिकोनातून निःसंशय सरस आहे. इवल्याशा गवताच्या पात्यातसुद्धा कवीला गहन अर्थ गवसला. या कवितेवरून त्यांच्या लेखणीचा चौफेर पदन्यास आणि त्यांच्या प्रज्ञेची आश्चर्यकारक मुलुखगिरी पाहून कोणताही रसिक स्तंभित वा अवाक् झाल्यावाचून राहणार नाही. या कवितेत तांब्यांनी दलितांचे आणि शोषितांचे वरिष्ठांशी असणारे खरे मानवतेचे नाते उघड करून दाखविले आहे. इथे साम्यवादाच्या आणि समाजवादाच्या भव्योदात्त कल्पनासुद्धा ओशाळून जाव्यात अशा शब्दांत त्यांनी वर्गसंघर्षाची जाणीव साध्या व सरळ परंतु श्लेषार्थी शब्दांत वर्णन केली आहे —

"तुम्हा परि सूर्यकिरणीं या न्हाणी !
तुम्हा परि वरुण पाजि या पाणि,
तुम्हा परि पवन गाइ या गाणि'
वघा हे नातें"

या कवितेतून प्रगट होणारा समाजवादी व समतावादी दृष्टिकोन तांब्यांची तत्कालीन स्थिती-विषयी त्यांच्या अंतःकरणातील सदैव जागृतावस्थेत असलेली मनःस्थिती प्रगट करतो.

तसे पाहू जाता, प्रत्येक कलावंतावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष समाजिक घडामोडींचा परिणाम होऊनच एखादी कलाकृती जन्म घेते; कलावंताचा समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन त्या कलाकृतीत अभिव्यक्त होतो. थोडक्यात, समाजाशिवाय कलावंत आणि कलाकृती असूच शकत नाही.

साहित्य आणि समाज यांचा संबंध सुटला की साहित्यही निर्जीव बनते आणि समाजही पांगळा होतो. संस्कृत वाङमयाचे असेच झाल्याचा इतिहास आपल्या डोळ्यांपुढे आहे. प्रत्यक्ष जपानविरोधी लढाईची धुमश्चक्री चालू असताना माओ-त्से-तुंगने साहित्यपरिषद बोलावून समाज व साहित्य यांचा निकटचा संबंध जगापुढे मांडला होता. म्हणूनच साहित्याला सामाजिक जबाबदारी निश्चितपणे आहे, मग ही जबाबदारी समतेची जाणीव निर्माण करणारी असो की सत्याचे स्वरूप उलगडणारी असो.

उपरोक्त विश्लेषणाच्या पार्श्वभूमीवर भास्करराव तांब्यांच्या काही सामाजिक कवितांवर दृष्टिक्षेप टाकल्यास आपणास काय आढळून येते ते पाहा.

जगातील धनवंताचा साम्राज्यवाद आणि गरिबांचा समता वाद यांच्यातील भयानक विषमता दाखविणारी 'रुंद दरा' तांब्यांनी 'रुद्रास आवाहन' या कवितेते स्पष्ट केली. तसेच 'घन तमीं शुक्र बघ राज्य करी' या कवितेतील प्रवळ आशावाद आणि उदात्त भावना विपद्‌अवस्थेतील तरुणांच्या ठिकाणी स्वाभिमान प्रज्वलित करावयास पुरेशी समर्थ आहे. दलित व पीडित समाजातील उपेक्षित घटकांच्या ज्वलंत समस्येच्या व्यापक भूमिकेवर उभे राहून तांब्यांनी आपल्या देशातील दलित वर्गाची दुःखेच विदारकपणे चव्हाट्यावर आणण्याचे कार्य आपल्या काही कवितांमधून केले आहे.

ज्या कलाकृतीला सामाजिक जाणीवा कुठल्याही सीमारेषेवर स्पर्श करीत नाहीत ती कलाकृती अमर किंवा अक्षर वाङमयात जमा होऊ शकत नाही. आणि केवळ एखादी कलाकृती केवळ सामाजिक जाणीवांची अभिव्यक्ती करते असे म्हटल्याने त्या कलाकृतीचे मोल वाढत नाही तर मुख्यत्वाने त्या कवितेतील





मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सामाजिक आशय हा कवीच्या, लेखकांच्या लेखनगर्भ आत्मनिष्ठेतून, हृदयाच्या स्पंदनातून स्फुरावा लागतो. ही कसोटी इथे महत्वाची ठरते.

तांब्यांच्या काळात अनेक दुष्ट प्रचलित रूढींचे पालन होई. विधवांचा पुनर्विवाह ही त्याकाळची एक भेसूर आणि जाचक समस्या असे. विधवेला केशवपन केल्यानंतर उर्वरित आयुष्य एखाद्या शूद्रासारखे व्यतित करावे लागत असे. समाजात विधवेची तीव्र उपेक्षा करण्यात येई. हा घटक समाजात त्याकाळी बहिष्कृत समजला जाई. विधवांच्या हृदयातील हे मूक आक्रंदन तांब्यांनी आपल्या संवेदनशील वृत्तीमुळे प्रभावीपणे टिपले आणि आपल्या सव्यसाची लेखणीतून त्यांनी विधवांच्या दुःखांना वाचा फोडली. त्यांनी आपल्या 'विधवेचे स्वप्न', 'निःशब्द आत्मयज्ञ', 'बघुनी तया मज होय कसेंसें', 'हिंदु विधवेचें मन', 'चरणाखालील हाय मीच रज', 'तें कान्त यापुढे !' इत्यादी कवितांमधून आपला विधवांविषयींचा पुरोगामी, समतावादी, आणि न्यायवादी दृष्टिकोन समर्पकपणे आविष्कृत केला आहे. 'हिंदु विधवेचे मन' या कवितेतली हिंदू विधवा स्त्री आणि तिच्यावर अनुरक्त झालेला व तिचे प्रियाधन करणारा पुरुष आणि त्या दोघांच्या अंतःकरणातील भावनिक आंदोलने तांब्यांनी या कवितेत उलगडलेली आहेत.

विधवेचे मन पुनर्विवाहाकरिता उद्युक्त करताना, तिचे मन वळविण्याकरिता झालेला युक्तिवाद पाहा :—

"नीरस वेलिस फुलें उमलती,
खिन्न नभाला तारे भेटति,
रिक्त सरोवरिं कमळें फुलती"

त्याचप्रमाणे तुझ्या आयुष्यात पुनरपि विवाहामुळे 'वसंत' फुलण्याची शक्यता आहे. तेव्हा ती विधवा हा प्रस्ताव कठोरपणे नाकारून म्हणते की,—

"बहिण होईन, दासी होईन,
भक्त होउनी चरणां पूजिन,
तुमच्या वाटा केशीं झाडिन,"

'परंतु मला आपल्याशी विवाह करण्याचा आग्रह करू नका, तो योग या जन्मी शक्य नाही'. केवळ समाजातील निर्दय परंपरेने दोन हृदयांचे मीलन, इच्छा असूनही घडू नये ही दुःखद जाणीव तांब्यांनी आपल्या कवितेतून तत्कालीन समाजापुढे मांडलेली आहे. विधवांविषयी केवळ कोरडी सहानुभूती न दाखविता अत्यंत तन्मयतेने नि प्रामाणिकपणाने त्यांनी विधवांच्या स्थितीचे दारुण चित्रण केले. अनेक सामाजिक अन्यायांनी व विसंगतींनी परिपूर्ण असलेल्या दुष्ट रूढींतून बाहेर पडून विशाल वातावरणात प्रवेश करण्याची सहेतुक धडपड कवीला लागलेली आहे, हे जाणवते. तांब्यांना जाणवलेली सामाजिकता अंतःप्रेममूलक आहे. त्यांच्या कविता सामाजिक जाणिवेपासून पूर्णपणे अलिप्त नाहीत हे वरील विवेचनावरून आपल्या लक्षात येईल. कधी लक्ष्यार्थाने तर कधी वाच्यार्थाने त्यांनी आपल्या काव्यातून सामाजिकतेचा संदर्भ वाचकांसमोर आणून ठेवला आहे.

सामाजिक विषमतेविषयी आणि दुष्ट रूढींविषयी प्रत्यक्ष क्रांती किंवा बंड करून उठण्याची बुद्धी तांब्यांना जरी झाली नाही, तरी त्यांनी अर्पण केलेले सामाजिक आशयरूपी दुर्वादलसुद्धा रसिकांनी अव्हेरू नये इतपत त्यांच्या काव्यात सामाजिक सुधारणेची पुरोगामी दृष्टी आढळते, हे मात्र निर्विवाद.

---

**संपादकांचा खुलासा :—**

'युगवाणी'च्या दिवाळी १९७७ च्या अंकात पृ. १५७ वर प्रसिद्ध झालेल्या माधुरी पारसनीस यांच्या कवितेतील अनवधानाने गाळल्या गेलेल्या शेवटच्या दोन ओळी पुढील प्रमाणे आहेत :—

"—तुझ्या ह्या जखमा !
तुझ्या ह्या जखमा खिळे ठोकल्याच्या तर नाहीत ना?!"



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

# योगेन्द्र मेश्राम / तो कधी हसला नाही !

रोजच्यासारखाच आजचा दिवस.

रोज नाही तरी आठवड्यातून – थोडं लांब म्हटलं तर पंधरवाड्यातून नक्कीच तिची-माझी भेट होत असे, बगीच्यात–एखाद्‌वेळी सिनेमा-थिएटरात नाहीतर चौपाटीवर. आज मी दादर-चौपाटीकडेच चाललो होतो.

दिवाबत्तीची वेळ व्हायला येत होती. पण आज जरा आधीच, आधीच सजवून असलेले बंगले, बंगल्यांच्या कमानदार गेट्‌स, त्यांवरील लतावेली व झाडे रंगीबेरंगी विजलीने झगमगू लागलेली. घरोघरी उत्सव.–आणि माझ्या चटकन् लक्षात आले. सकाळची वहिनी आठवली. . तिने सांजवेळीचा उत्सव पहायला–सभा ऐकायला शिवाजीपार्कला चलण्यासाठी भाऊची मनधरणी केली होती. . आज पंधरा आगष्ट ना ! . पण तो भाऊ पडला. कानावर माशी बसू न देता दैनिक पेपराची भलीमोठी थैली सायकलला लटकवून तो निघून गेला होता.

समोरच्या वाढत्या रोषणाईने माझे लक्ष वेघले. आकर्षकरीत्या सप्तरंगी लाइटांनी व तिरंगी तोरणांनी सजवलेले स्टेज नुसते झगझगत होते. स्वातंत्र्य-गीताची स्फुरणदायी धून बॅन्डचौघड्यावर वाजत होती. लाऊडस्पीकर ओरडत होता.

मी 'मूडी' माणूसघाण्या कशामुळे झालो कळत नाही. आधीचे मनाचे खुललेपण आताशा पार मावळत चालले. . स्टेजकडे लोकांत जाऊन बसण्याऐवजी मी आपल्याच तंद्रीत आपल्या ठराविक जागेकडे गेलो. इकडे-तिकडे पाहिले. आशा दिसली नाही. वाट पहात बसलो, ताडाच्या झाडाखाली.

आता एक आशाच अशी होती, की . . . तिच्याजवळ मी पूर्ण खुला होत असे. माझ्या मरगळलेल्या–थांबलेल्या आयुष्यात तिचा सहवास म्हणजे मला एकप्रकारचं चैतन्य होतं. आनंदाचं मोहक प्रलोभन होतं. सोडवत नव्हतं. मी असा तिच्या पुरता नादी लागलेलो, वेड्यासारखा. ती मात्र मला अजून पुरती उमगलेली नव्हती. एक 'रहस्य' वाटत होती.

आशा जॉननं आपलं नाव 'लुसी जॉन' केलं होतं. पण मला 'आशा'च आवडत होतं. उलट प्रेमाच्या मुडांत . . . माझ्या 'माधव'चा तिनं 'मायकेल' करून टाकला होता पण मला 'तो' कसातरीच वाटायचा.

. बराच वेळ झाला. मला बोअर होऊ लागलं. तिकडे स्टेज सुरू झालं. एका लोकप्रिय नेत्याचा वजनदार आवाज —

' . ही गौरवाची गोष्ट की आम्ही स्वतंत्र देशाचे स्वतंत्र. . प्रगती. . ह्या एकोणतीस-तीस सालांत असंतोषकारक नाही. आपला देश. . वर्तमान स्थितीवरून पुष्कळच पुढे. . पुष्कळ. . पुष्कळ . . . तरीसुद्धा–. . आणि ह्याच्यासाठी ह्या बिकट परिस्थितीतून. . विषमतेविरुद्ध तनामनाने लढा दिल्याशिवाय . तेव्हा. . पण. . जर. . धीर ठेवून. . कदाचित् . . 'इन्तजार' करावा लागेल. फळ अवश्यच . . .'

आशा, आशा ! –आशा अजूनपर्यंत आली नव्हती—खोटारडी ! वाट पहाण्यात कसलं तरी सुख असतं म्हणतात. मला मन उखडण्याशिवाय काही वाटलं नाही. प्रतीक्षेचे फळ 'मीठे' असो की 'खट्टे', माझ्या मनातली उत्सुकता मात्र गुदमरू लागली.

. . आशा एक तरुणसुंदर, अत्याधुनिक वातावरणात वाढलेली मोठी लोभस पोरगी होती, प्यारी-प्यारी ! ती मूळची ब्राह्मणकन्या. तिच्या लहानपणीच मिल्ट्रीत असलेला बाप लढाईत मरण पावला. तिच्या आईने नंतर एका अँग्लो इंडियनलाच नवरा केला. आशा माझ्याबरोबर एम्. ए. पर्यंत होती. आता त्यांच्याच ख्रिश्चन-स्कूलमध्ये ती शिक्षिका झाडलेली.



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ती स्वभावाने स्वच्छंद-मोकळी-रसिक-दिलेर होती आणि आधुनिक होती. त्यामुळे तिच्या ठिकाणी भेदभाव नसल्याचा, जुनी परंपरा रूढी मानत नसल्याचाच तिने मला प्रत्यय आणून दिला होता.

.अगोदरपासूनच आमचे जुळले होते. म्हणून ती मला विसरणार नव्हती. आजमात्र कधी केला नाही इतका उशीर. . .तसेच काही कारण असेल. .मनाला धीर देऊन मी वाट पहात बसलो.

तो आपला आपल्यात न मावणारा जाम उत्सवाचा दिवस. स्वातंत्र्याचा २५ सावा वाढदिवस ! स्वातंत्र्याची रजतजयंती पहायला आम्ही गेलो होतो. आणि त्या महोत्सवाच्या दिवशीच आमच्या मैत्रीचं प्रेमात रूपांतर होऊन गेलं होतं. .त्या दिवशी असंच तिनं खूप तडपवलं होतं. पण अखेर पाठीमागून नाजूक लांबसरळ बोटं गप्पकन् माझ्या डोळ्यांवर येऊन वसली.

—ती विशेष 'खूबसूरत' होऊन आली होती.. .रेखीव आंखलेले डोळे. फिक्कट गुलाबी लिपस्टिकने माखलेले ओठ. कानात सुंदर डिझाईनदार सोन्याची झुंबरं. केसात खोवलेली दोन टपोरी गुलाबाची फुलं, तिची आवडती. आणि मोहविणारा सुगंधित सेंट. .तिच्या अंगाचा नुसता घमघमाट येत होता. . . तिने झगमगत्या स्टेजकडे पाहिलं. नंतर माझ्याकडे बघून म्हणाली—"आय् एम् सॉरी मिस्टर मधु, उशीर झाला ! . . .अरे, तू आजपण उदास दिसतोस ? व्हाय यू स्याड डियर—सर्वीकडे खुषीच खुषी असताना—"

"माझ्यात नाही".

"का ?"

"माझा आत्मा गहाण आहे".

"तू फिलासॉफर आहेस ?"

"आपल्याच शोधात असलेला मी एक मामुली माणूस आहे".

"आज तू हे काय बोलतोस, कळत नाही बाबा".

"मी स्वतःलाच अद्यापपर्यंत ओळखू शकलो नाही".

"कठीण आहे तुझ्यापुढे स्थितप्रज्ञजी !"—तिने मान कलून स्टेजकडे वघितले. मीही लक्ष दिले . .तेच ते जुनेपुराणे टेप-रेकार्ड. राष्ट्रीय समारोह—पंधरा आगष्ट असो की सव्वीस जानेवारी असो आता ते त्यावेळीही—

.देशापुढे अनेक कठीण समस्या आहेत. ही आपल्या कसोटीची वेळ. .प्रसंगी बलिदान ! स्वातंत्र्यासाठी वलिदान—ते टिकविण्यासाठीही बलिदान. .दुष्काळ—बेकारी. .उपासमारी. .महागाईच्या जबड्यात ! 'कारण स्वातंत्र्य हे नेहमीच महाग असते. '

भाष्य. .! समस्या खरोखर कठीण ! कठीण म्हणूनच 'समस्या' ! .त्यात खरं खोटं काही असो, सवाल मात्र खरा—देशापुढचा नेत्यापुढे—'या देशाचं काय होणार ?'

' .अरे अगोदर माझं काय होणार ?'—तिकडून लक्ष काढून मी आशाला म्हटलं—"तुला काही सुचतं का ?"

"अंहं. .तुझं आपलं नेहमीच माझं माझं. त्या पुढाऱ्याच्यापुढे कमीत कमी देशाचा सवाल आहे"

"झूट झूट ! बोगस बात आहे ! प्रथम तुझे-माझे सवाल सुटल्याशिवाय—"

"त्याला वेळ लागेल"—ती संवयीप्रमाणे अभिनय करीत म्हणाली—,

"—तरी तू आपल्यासाठी"

"मी कुणासाठी काही करू शकत नाही".

"कुणासाठी म्हणजे ?"

"माझ्यापुढे त्याचा प्रश्न आहे".



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"त्याचा कुणाचा ?"

"भावाचा. माझा बाप होऊन त्यानंच मला इतकं वाढवलं. तरीसुद्धा–"

. .तो आधीचा तेजवाण्या बोलका माणूस. अबोध वयात–मला चेव नव्हता तेव्हाच बाप गेला. मागाहून आईसुद्धा झिजून हाय खाऊन मरण पावली. आणि नको त्या वयापासून संसाराची धुरा भावाच्या मानेवर पडली. त्यामुळे असा झाला. . .दिवसभर धावपळ. काम आणि काम. सकाळी दैनिक पेपर्स वाटण्याचं. दुपारी फॅक्टरीचे जेवणाचे डबे पोचवायचं. नंतर एका मारवाड्याच्या दुकानात वही-खात्याचं. .किती कामं. . .ओठातल्या ओठात पुटपुटत. कधी कोणाशी मिळून मिसळून हसून बोलायची त्याला फुरसदच मिळत नाही. लोक त्याला वेड्यात काढतात. लोकांचे काय, उगीच हसणाऱ्याला ते वेडा म्हणतात, न हसणाऱ्यालासुद्धा म्हणतात. .वायकोपोरांची. .माझी काळजी. .वाढती जिम्मेदारी. पण हिंमतीचा, जिद्दीचा खरा. आपण फार असं नाही शिकला. पण काळाची गरज ओळखून मनातल्या जिद्दीला जिवंत करण्यासाठी त्यानं जिवाचं रान करून मला शिकवलं. एका आशेनं. पण त्याचा भार हलका करण्याऐवजी मी असा त्याच्या जिवावर भार होऊन जगत होतो.

–मी माझ्या मोडल्या–खंगलेल्या भावाचा मुका-मरगळ चेहरा आठवून आशाला सांगितलं– "माझ्या यादीत मी त्याला कधी हसताना पाह्यलं नाही".

"तू तरी कुठे हसतोस ? वेरी रेअरली सीन यू लाफिंग".

"कसा हसू ? तो हसत नाही, मी हसत नाही. मी एकदा का हसलो तर तोही हसेल. पण .

"हसण्यावरचं तुझं हे विजगणिताचं सूत्र मला कळलं नाही बुवा".

"अग मी बेकार आहे, एम्. ए. होऊनसुद्धा—माहीत नाही ? भावाच्या उरावर. . .मला लाज वाटते. दु:ख होते. शिकलेला म्हणून बिगार करण्याची लाज वाटते. आणि बेकार आहे म्हणून असा तुझ्या-बरोबर–" मी बोलून गेलो. ती रुष्ट होऊन म्हणाली—"म्हणजे मी तुला इतकी बेकार वाटले काय ?"

तसा अर्थ घेऊ नकोस." ती नाराज झालेली बघून मी म्हणालो,

"हवं तर मी माझे शब्द मागे घेतो. पुन्हा आज स्वातंत्र्यदिन, वाटलं तर थोडं हसून घेतो तुझ्याबरोबर. .बघ, तो मराठी लीडर हिंदीत काय झकास बोलतो आहे".

"अस्सं ! असेल झक्कास बोलत. पण तोही जरा नाकातच बोलतो. शिवाय मराठी माणसं घरातलंच अधिक बोलतात".

"हो का !"–मी तिची कोपरखळी ओळखून म्हटलं, "मराठी माणसाला तू अभ्यासलं नसशील. घरातलं भांडण मिटलेलं नाही. म्हणून–"

"ते कधी मिटणारही नाही. म्हणून तो वर्षान्‌वर्षांपासून होता त्या घाणीत आजही उभा आहे".

"असू दे. पण ही बाब सोडली तर तो इतर कोणत्याही बाबतीत मागे नाही".

"पुढेही नाही".

"काय अर्थ ?"

"तो तसाच पाखंडी अन् भित्रा आहे. भ्रष्टाचारी आहे. आणि अत्याचारीसुद्धा–"

"असेल, त्याची परंपरा त्याला प्रिय आहे. प्रत्येकाला असते. आणि ती सोडायलाच पाहिजे असं शास्त्र कुठं आहे ? .पुन्हा माणूस म्हणून – स्वार्थ नि वाढती लालसा कोणाही माणसाला भ्रष्ट-दुराचारी करते. राजकारणात तर फार. .अग, आता 'टॉर्च'ची गरज आहे".

"कशाला ?"

"इमानदारी शोधायला".

ती हसली. "मला राजकारण कळत नाही. आवडत नाही".



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"मलाही समजत नाही म्हणून आवडत नाही"

"बरं चल, जरा तिकडे जाऊन येऊ. इथं बोअर होऊ लागलं".

–ती माझा हात धरून उठली. थोडं अंतर चालून गेलो. मग मी तिला जवळ करून एका पसरट गोलाकार झुडपाच्या आडोशाला आम्ही जरासं थांबलो. आणि–

.डोक्याचे खाली पडलेले फूल उचलून ती बाजूला सरली. झगमग लाइटाचा सरत आलेला ठिपका तिच्या चेहऱ्यावर पडला. .गालावर तांबूस खुणांचा सुंदर उठाव दिसला. ओठावरची चकाकती पाझर पुसून ती लाडिक-उसन्या भावानं बोलली –

"कुणी बघितलं तर काय म्हणेल–मायकेल, तू बेशरम आहेस !"

"बघणाऱ्याला तरी शरम असते कुठे ? . . .पण तू घाबरू नकोस. ह्या झाडाच्या सावलीत मी आपली घरची-दारची शरम शाबूत ठेवली आहे".

हे गमतीचे बोलणे. पण ते माझ्या मस्तकात फिरून गेले. सव्वीस वर्षांचा मी. ह्या २५ वर्षांच्या स्वतंत्र देशात अजूनपर्यंत स्वतःचं घर पाह्यलं नाही. बापजाद्यापासून किरायाचं घर. हागधाणीच्या उबडखाबड मैदानावर वसलेल्या झोपडपट्टीमधील घर. त्याच घरात माझा जन्म झाला. वाढलो. भावाच्या संसारात .एकाच पसाऱ्या खोलीत सगळे. सगळ्यांचे सर्व काही. डोळे लावून पहायचं. .लाज-शरमेनं मेलेलं मन तेथे मोठं कसं व्हायचं ! कसं व्हायचं.

"कसला विचार आलाय मधू ?"

"काही नाही". –मनात उठलेली उकस मानेला झटका देऊन मी घालवली. आणि आधीच्याच सुरात बोललो, "नाही म्हणजे ह्या झाडोऱ्याच्या अंधारवटात–"

"अंधारालाही डोळे असतात मिस्टर मधु मेंढे".

"आणि उजेडाला–?"

"तुझं डोकं ! चल–" म्हणत ती हळूच माझ्या गालावर चापटी देऊन पुढे पळत गेली.

–आणि मला आता जागच्या जागीच धक्का बसला. आशा अजूनपर्यंत आली नव्हती. मी कंटाळलो. मला तिचा संताप आला. तिला मनातून काढण्याचा प्रयत्न करत आता मी स्टेजकडे लक्ष दिले, शीण सरावा म्हणून.

आता सभेचे मुख्य अतिथी बोलत होते. जनतेला आश्वासनं देत होते. टाळ्या घेत होते. गरीब आसुतलेले भोळे-भाबडे लोक भावाळून जाऊन ते सन्माननीय पुढाऱ्याचा मोठ्या जोशाने जयजयकार करीत होते. जनता स्वातंत्र्य-सोहळ्यात अशी आनंदमग्न होऊन गेली होती.

.परवाचा स्वातंत्र्यदिन, कालचा आणि कालच्यासारखाच आजचा स्वातंत्र्यदिन ! .टेप-रेकार्ड आश्वासनांचं. पूर्ण केली जात नाहीत तीच आश्वासनं. आमिषं. नवनवीन. नवीन कसली–नव्या शब्दांत जुनीच ! .आमिषांच्या गर्भात ढोंग आणि स्वार्थाचा दर्प नसेल तर ती आमिषं कसली ? आमिषं. .आश्वासनं निर्जीव शब्दांचा पाऊस ! .दुष्काळ–महागाईवर. .बेकारीवर. .उपासमारी-वर. . .समाजवाद !

.देशाला त्यागाची गरज आहे. आत्मविश्वास ठेवा. इमान राखा. . .सहकार्य द्या. . . . .त्यागाशिवाय. . '

त्याग त्याग ! गरिबी तर पळापळाला वीत वीत वाढते आहे. आणि गरीब–. . .कसला त्याग–? उपाशी पोटाला.

हा झगमगाट ! हा काठोकाठ चमचम थाट ! हे वैभवाचं भडक प्रदर्शन ! –हे सारं बघून गरीब लोकांत काय खाक आत्मविश्वास निर्माण होणाराय ?



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माणूस माणसासाठी माणुसकीने ओथंबता तर तुपात तेल, तेलात 'पाणी' आणि पाण्याच्या वस्तूला शुद्ध तुपाचा भाव आला नसता. . .माणसाचे पुरे 'तेल' झाले.

क्षणोक्षणी. . .पदोपदी धोका ! अनिश्चितता आणि अभाव ! पिळवणूक. . .फसवणूक ! . .जीवनाच्या जाणिवेचे रोड तडकले. आणि त्यावर 'बर्स्ट' झालेल्या टायरींचा खच पडला. अनवाणी ठेचाळलेली पावलं रक्तबंबाळ झालीत ! खून खून ! इथं-तिथं-सर्वत्र. रक्ताचा सडा !

जन्मापासून मरणापर्यंत हा कोलाहल ! कलकलाट ! आक्रोश !

प्रत्येक पंधरा आगष्ट येतो आणि आक्रोश घेऊन जातो.

स्वातंत्र्य सोहळ्यात कोण गरीब-लोक तो ! . . .बरेच भिकारी. आज जरा ज्यास्तच 'आझाद' होऊन भीक मागायला दिसतायेत. खुपीखुपीत,. .तुकड्याचा आनंद कुत्र्याला ! ही कशी माणसं ! आज स्वतंत्र दिवस आणि भीक न मागण्याचं स्वातंत्र्यसुद्धा त्यांना नाही. भिकारी माणसाचं भिकार स्वातंत्र्य ! त्यांचा तो आनंद भिकार. इच्छा भिकार !—की त्यांना इच्छाच नसतात—मग स्वातंत्र्य कुठले ?

भारताचा स्वातंत्र्यदिन ! मूठभर हवेल्या. . .आंजुळभर बंगले. . .आणि टोपलीभर टोप्या—त्यातून तेवढा टणत्कार स्वातंत्र्य वीणेचा !

मला रस वाटला नाही. सभोवतालच्या भयाण अंधाराच्या पसाऱ्यामधली ही रोषणाई आणखीच भडक लागली. डोळे दिपू लागले. मी आता अंधारलेल्या समुद्राकडे तोंड करून सहज आकाशाकडे बघू लागलो. माझं एकटे भकास मन विशाल आकाशाच्या भव्यतेत खिळू लागले. दुरून विलोभनीय वाटणाऱ्या चमकत्या चांदण्यांकडे मी भान विसरून बघत असतानाच मला तिची पुन्हा तीव्र आठवण झाली.

. . .असं कधी झालं नाही. कशी आली नाही, का—काही कळेना. स्मरेना. मनातल्या विश्वासाला तडा जाऊ लागला.

आशा !—आशा मोठी मोहक—लोभस होती. लडिवाळपणे बोलून मनाला भुलवण पाडण्याइतकं आकर्षण तिच्याजवळ खचित होतं. ती प्रेमोत्सुक—प्रियाराधिनी होती. आपलं प्रेम देऊन माझं आयुष्य फुलवणार होती. मला नवजीवन देणार होती. आणि तेच आज ठरवायचं ठरलं होतं.

. . .मनसुबे. . .आयुष्य बांधायच्याबद्दल—नव्या धाग्यांनी, नव्या करारांनी वगैरे. . .एका नव्या क्षितिजाकडे वाटचाल करण्याच्या दृष्टीने. असं आखून ठेवायचं होतं आशाआकांक्षांचं क्षितिज. . .जमलं तर माझ्या थांबलेल्या वर्तमानाला पुढे दवडवून हसायचं होतं. आणि निराश-नाउमेद झालेल्या, थकलेल्या-खचलेल्या भावाला हसवायचं होतं. तो कधी हसला नाही. हसत नाही. ह्या एकोणतीस-तीस वर्षांच्या स्वातंत्र्यानं हसवलं नाही.

आज स्वातंत्र्याचा दिवस. वसुली मिळाली नाही. सकाळी खाडाच पडला. घरात काय झाले, समजले नाही—दुपारी भाऊ ज्यास्तच पुटपुटत होता. . .अगदी निराश-हताश. . .गळून गेल्यासारखा ! काहीतरी द्विधा विचित्र मन:स्थितीत असावा. घरात कुणासंगंच बोलला नाही. पुन्हा बाहेर गेला.

. . .मला दुपारचा भाऊ आठवला तसा मी आणखीन तडकलो. मला माझा असा वैताग आला की—

. . .मण उरात कुठेतरी आशेचा एक धागा लोंबत होता. तो कधी जुळेल की नाही, काही कळत नव्हतं. तरी आशाच्या शब्दांवर मी विसंबून राहावं, असं तिनं मला भारून टाकलेलं, घेरून ठेवलेलं होतं. . . वाटलं, आज नाही तर उद्या आपले मनोरथ पूर्ण होतील. या आशेनंच तुटलेल्या मनाची उद्याला जुळण्याची तयारी करीत मी जाऊ लागलो.

—आशा माझ्या तनामनात होती. डोळ्यात होती. नजरेपुढून जाता जात नव्हती. . .

मी तिच्या खांद्यावर हात ठेवून म्हणालो, "चल, आता इथं राहवत नाही. मला माझे डोळे शाबूत ठेवायचेत".



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

—त्या चकचकाटाला कंटाळून आम्ही हातात हात धरून पाय पडतील तिकडे चालू लागलो.

"कुठे ?"

"कुठेही. .हा झगमगाट सोडून".

"कुठेही—पण कुठे ?"

"मला किनारा कुठे आहे ? . . .वादळात नाव दिशाभूल झालेली आहे".

"असं निरर्थक भटकण्यात काय अर्थ ? .कुठे येऊ म्हणतोस ?"

"अंधारात, अंधाराचा अर्थ शोधायला. .जाऊ दे. मला रडायला येतं. झक्क अंधारात रडून तरी घेईन म्हणतो. कुणाला दिसणार नाही चल.—"

"नको, पुढे नको. मला भीती वाटते".

"कसली ?"

"—त्या अंधाराची".

अंधाराला माणूस का भितो, कळत नाही. मला तो आपला वाटतो . . .मी हळू हळू हरवू लागलो. तिच्या कमरेभोवती हात गुंडाळून कानाशी हळूच बोललो— "—का माझी ?"

"नको नको मधू, तू गैरफायदा घेतोस".

"दुसरं काय सुख आहे वाटयाला ?"

"या आधीही घेतलाएस"

"काय झालं ?"

"होऊन गेलं. .सर्व काही—ऑल दयाट ! बट् आय् डिडन्ट माईण्ड ओन्ली फार युवर सेक".

"माझ्यासाठी—? पण मी तसं काय गैर केलं – तू सुद्धा—"

च्यायला, हा भलताच घापला ! तिला दुसरेही काही दोम्त होते. आणि आळ माझ्यावर. ती चिंतित स्वरात म्हणाली, "नो. नो. .यापुढं अजिवात चान्स देणार नाही ! तुझ्यासाठी सगळं. .बट नाऊ नॉट दयाट. .अनडयू लिबर्टी. .नो मोअर!"

"वन्स मोअर प्लीज. पुढचं कोण विचारतो ?"

"आणि मागचं—व्हॉट अबौट माय पास्ट ?"

"त्याची माझ्यापुरती दखल घेतो. .मी दिलगीर आहे"

"का शादी करणाराएस तू ?"

मी खोटया आशेवर जगायचं सोडलं म्हणून एकदा 'रोख मोजून' घेतलं होतं. म्हणून मला ती आता आपल्या घेऱ्यात घेऊ बघत होती. निर्णय मागत म्हणाली, "बोल, नि मगच हात लाव".—तिचा हा आणिबाणीचा सूर ऐकून मी चक्रावलो. विचार न करता बोललो—"समज, आय् यम् एट युवर प्रपोजल".

"ग्रेट ! स्ट्रेन्ज ! .बट् मुष्कील आहे. पुढचं ऐकून तुला भारी पडेलाय् मिस्टर !"

"बघू. बोल काय ते".

"बघते, छाननीच करते आता तुझ्या मर्दपणाची".

—मी आश्चर्यानं हडबडून विचारलं—"कसली ?"

"एका अटीत—" तिच्या डोळयात वीज चमकली—

"माझा धर्म घेशील ?"—हा अति जड प्रश्न तिने अंगावर पावडर छिडकावा इतक्या सहज फेकून दिला. मी म्हटलं—

"नाही. पण हा प्रश्न कुठे आड येतो ?"

"येतो. तू बौद्ध झालास तरी दुनियेला दलित,—महार म्हणूनच तू ठाऊक आहेस".

(पृष्ठ २२७ वर पाहा)





मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

## अक्षयकुमार काळे / **दशपदी**

अनिलांची संगृहीत कविता अनुभवताना इतर बाह्य मोह मला नेहमीच त्रास देत आले आहेत. म्हणून 'दशपदी' हाती आली तेव्हा सावध होतो. प्रस्तावना वाचायची नाही आणि कोणत्या प्रवासात कोणत्या दिवशी या कविता जन्मल्या याचा वेध घ्यायचा नाही असे मनाशी ठरवून टाकले. आतापर्यंत हे मोह टाळता आले नाहीत. 'फुलवात' ची प्रस्तावना व मागची पाने संगीतातले न कळताही चाळली. 'भग्नमूर्ती'ची प्रस्तावना वाचल्यावाचून रहावले नाही. 'सांगाती'त मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष काय म्हणतात ते पाहिलेच. समीक्षकाचा स्वभाव, पण दशपदी अनुभवताना मात्र कटाक्षाने हे सगळे टाळले. तसे 'सांगाती' वाचल्यापासून, दशपदी तिची अपरिहार्यता, अनिलांचा मुक्तछंद आणि मुख्यतः वृत्तबंधनाकडून मुक्तछंदाकडे आणि मुक्तछंदाकडून दशपदीकडे झालेला प्रवास या गोष्टी समीक्षेच्या पातळीवर जाणवत होत्या. सातत्याने केवळ दशपदीच गेल्या पंधरा सोळा वर्षांत अनिलांनी का लिहिली ? अनिलनिर्मित हा नवा आकृतिबंध आहे का ? ही काव्यात्म अपरिहार्यता आहे का ? क्रांतीनंतर प्रतिक्रांती या न्यायाने प्रयोगाकडून प्रयोगाकडे जाण्याचा हा प्रकार आहे का ? या प्रश्नांची उत्तरे किंवा जे प्रश्न आपल्याला पडले नसतील त्याही प्रश्नांची उत्तरे अनिलांनी 'दशपदी'च्या प्रस्तावनेत देऊन ठेवली असतील ह्याचा विश्वास होता. पण ती न पाहताच अनिलांच्या दशपद्या अनुभवल्या अन् मन हरखून गेले. मग प्रस्तावना वाचण्याची आवश्यकता आहेच असे मात्र वाटले नाही.

अनिलांची ही सगळीच कविता भावकविता आहे. अनिलांच्या संपूर्ण कवितेचे—**फुलवात मधली सगळी कविता आणि दशपदी,** असे टप्पे मनाशी गृहीत धरले तर दशपदीचे नाते अनिलांच्या पंचविशीतल्या कवितेशी आहे असे वाटू लागते. तिचा धागा 'फुलवात' मधल्या वृत्तीशी, त्यातल्या भावावस्थेशी कुठेतरी जुळतो आहे असे वाटू लागले. 'फुलवात' मधील कोवळी भावावस्था इथे नाही. प्रेयसीच्या मीलनाची उत्कंठा, आशा निराशेचे चढते उतरते रंग, प्रेमसाफल्याच्या अपेक्षेत बहरून आणि बावरून गेलेले मन इथे नसले आणि प्रेयसी काळाच्या पडद्याआड कायमची गेली असली तरी,—

> **किती किती किती म्हणत कितीदा कितीतरी प्रीती दिली घेतली**
> **कधी न वाटली झाली रिती रिती भरती वरती भरतीच आली—**

असा प्रीतीचा सुगंध अनिलांच्या मनात अक्षय्य दरवळतो आहे याची जाणीव होते. वस्तुतः उदास अवस्थेत वाटेवरच्या काट्यांवरून पुष्पपाकळ्यांच्या संगतीत सहजपणे चालावे तसे अनिल पुढे सरकत आहेत. स्वप्नातल्या मुक्या सावलीसारख्या दिसणाऱ्या आकृतीने अशरीरी रूपात अनिलांची एकाकी वाटेवर सदैव साथ केली आहे. अनिलांची ही कविता स्मृतिव्याकुळ आहे. तीत निराशा नाही. एकाकी जीवनातील व्याकुळ भावावस्थेचे गहिरे स्वप्नरंग आहेत. प्रेयसीचा दुरावा वाढतो आहे. तिच्यापर्यंत पोचणाऱ्या पाऊल-वाटा भिजल्या आहेत आणि आठवणींचे थकलेले पक्षी हळूहळू दूर कुठे तरी अज्ञात स्थळी निजण्यासाठी निघून गेले आहेत. आता प्रेयसीचे मीलन स्मरणाच्या सरणावरच केवळ शक्य होते. अनिल म्हणतात,

> **ताऱ्यांचा धरुन भार रात्रिस उरते न त्राण**
> **स्मरणावर प्राण जळे कसा तुझ्या विना !**

त्यांच्या या विकल अवस्थेत 'साथ', 'गतार्थ', 'सावल्या', 'चित्र', 'लहरी', 'दाद', 'एकरंग', 'चाललो' सारख्या सुंदर दशपद्या निर्माण झाल्या आहेत. त्यांतील सगळे स्मृतिगंध निसर्गातील पानापानांशी जखडलेले आहेत. त्यांच्या सगळ्या भावात्मक संवेदना निसर्गप्रतिमांद्वारा व्यक्त झाल्या आहेत. निसर्गाचे यथार्थ वर्णन एखाद दुसरी दशपदी वगळता दिसायचे नाही. त्यांच्या भरून आलेल्या अंतःकरणाने निसर्गाशी सदैव एकतानता साधली आहे. म्हणून केवळ निसर्गवास्तवाचे चित्रण न करता प्रतिमा-चित्रांची निर्मिती ते करतात



अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ज्यात अनिलांची आंतरिक संवेदना बाह्य निसर्गाशी एकरूप होऊन जाते.

**श्रावण झड बाहेरी मी अंतरि भिजलेला**
**पंखी खुपसून चोच एक पक्षी निजलेला**

इथे एका प्रतिमेत निसर्गचित्र आणि भावस्थिती स्पंदनशील शब्दांमध्ये प्रकट झाली आहे. त्यांच्या बहुसंख्य निसर्गचित्रणात वर्ण्यविषय व्यक्तिगत मनातील सुप्तावस्थेशी संबंधित आहे. त्यामुळे निसर्ग-चित्रणाची स्पष्टता त्यात नाही. अनिलांनी या दशपद्यांत अबोध पातळीवर विहरत असलेल्या सुप्त मनाच्या हालचालींचा अतिशय तरल शब्दांत वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. या सुप्त मनातील सौंदर्यासक्ती आणि तिला विलगून असलेली एक रिक्त उदासी याचा प्रत्यय या निसर्ग-चित्रांत होतो. 'विराणी', 'तदात्मता', 'तळ्याकाठीं', 'पावसाळी सांज', 'जुई' 'श्रावणझड', 'शरदागम', 'माघ', 'फाल्गुन', 'कालव', 'उशिराचा पाऊस' इत्यादी कविता अनिलांचे निसर्गाचे आकलन निरनिराळ्या भावनात्मक पातळयांवर कसे समृद्ध आहे हे दर्शविण्यास पुरेशा आहेत.

आजूबाजूला फुललेल्या निसर्गाची समृद्ध जाणीव आणि प्रेयसीच्या अशरीरी व्यक्तिमत्वाची गडद छाया या दशपद्यांतून जशी दृग्गोचर होते तशीच संध्याकाळच्या सावलीची स्पष्ट जाणीव या संग्रहात प्रतिबिंबित झाली आहे. पण कवीची अवस्था, 'संध्याछाया भिववीत हृदया' अशी भयग्रस्त नाही किंवा आयुष्याचा उत्तरार्धात भुतृ जीवनाचा बरावाईट गाळ उपसण्याची अनिलांची प्रवृत्ती नाही. अनिल अंतर्मुख होऊन तटस्थपणे आपल्या जीवनाकडे पाहत आहेत म्हणून बहादुर शहाच्या ओळींना—

**वाटते आयुष्य अवघे चार दिवसांचेच झाले**
**कसे गेले कळले नाही हाती फार थोडे आले**
**दोन दिवस आराधनेत दोन प्रतिक्षेत गेले**
**अर्धे जीवन प्रयत्नात अर्धे विवंचनेत गेले**

अशी वैयक्तिक जीवनाची डूब मिळते. ही डूब अर्थातच उदासीनतेकडे जाणारी आहे. आशावादी अनिलांची अशी व्याकुळ कविता वाचताना आपल्या आशावादी काव्यापासून अनिल वेगळे होत आहेत काय असा प्रश्न पडतो. पण कवितेत समर्थपणे विरण्याचा प्रयत्न केला, की लक्षात येते की ही आत्मविसंगती नव्हे. ही बदलत्या जीवनाचा समर्थपणे वेध घेणाऱ्या व्यक्तिमत्वातील अबोध सुसंगतीच आहे.

अनिलांची दशपदी, तिचा आवृत्तिदृष्ट्या विचार आणि तिचे ऐतिहासिक भवितव्य यांचा विचार करणे सध्यातरी कठीण आहे. पण आजच्या बहुसंख्य कवींनी मुक्त छंदाचा केलेला स्वीकार हे अनिलांच्या हयातीतच अनिलांना मिळालेले त्यांच्या ऐतिहासिक दृष्टीचे पारितोषिक होय. त्याचा विचार करता केशवसुतांनी आंग्ल काव्यातून स्वीकारलेल्या सुनीत-रचनेचा महावृक्ष झाला तिथे अनिलांच्या दशपदीचे रोप मूळ धरणार नाही कशावरून ?

दशपदी अनिल
मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९७६
पृष्ठे ९५ मूल्य १५ रुपये.



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

# वि. वा. प्रभु देसाई / मराठीच्या व्याकरणातील 'प्रथमा' आणि 'संबोधन'

विभक्ति-विचारात 'प्रथमा' ही अनामिका तर 'संबोधन' ही अव्हेरली विभक्ती होय. मराठीच्या व्याकरणात विभक्ती कोणत्या व किती मानाव्यात? व्याकरणातील अत्यंत महत्त्वाच्या मानल्या गेलेल्या या विषयाचा सांगोपांग परामर्ष घेण्याचा प्रयत्न दादोबा पांडुरंगांपासून प्रा. अरविंद मंगरूळकरांपर्यंत अनेक अभ्यासकांनी केलेला असला तरी जाणकारांचे पूर्णपणे समाधान होईल असा यासंबंधीचा निर्णय अद्याप तरी झालेला नाही. कोणत्याही बोलभाषेच्या व्याकरणविषयक व्यवस्थेचा विचार एकदाच कायमचा करणे शक्य नसते, हेही खरेच आहे.

दादोबा पांडुरंगांनी संस्कृताची परंपरा चालविण्यासाठी मराठीच्या व्याकरणात आठ विभक्ती मानल्या आहेत. कृष्णशास्त्री गोडबोले यांनी द्वितीया व षष्ठी कमी करून सहा विभक्ती मानल्या तर म. पां. सवनीस यांनी प्रथमा व षष्ठी कमी करून सहा विभक्ती मानल्या आहेत.

कृष्णशास्त्री चिपळूणकर हे आपल्या 'मराठी व्याकरणावरील निबंधांत' लिहितात :—"मराठीत **पाच** विभक्ती मानाव्या असे आम्हांस वाटते. आता या विभक्ती मानावयाच्या त्या मुख्यत्त्वेकरून प्रत्ययांवरून मानावयाच्या; परंतु एकाच अर्थाचे केवळ पर्यायासारखे जे प्रत्यय ते अनेक असले तरी त्या सर्वांची एकच विभक्ती गणावयाची" (आ. तिसरी, पुणे, १९२३, पृ. ६६). द्वितीया व षष्ठी कमी करून चिपळूणकर पुढे म्हणतात "आता संबोधन रूपास विभक्तित्व मानल्यास विभक्तींची संख्या **सहा** होईल" (पृष्ठ ६७). चिपळूणकरांनी प्रथमा (एकवचन) :—ओ, ऊ; प्रथमा (बहुवचन) :—ए, आ, एं, ईं असे प्रत्यय दिले आहेत. संबोधनाचे प्रत्यय त्यांनी दिलेले नाहीत.

ग. ह. केळकर यांनी **'मराठी व्याकरणाची मूलतत्त्वे'** विशद करताना आठ विभक्ती मानून "विभक्तींची संख्या यापेक्षा कमी करण्यात अर्थ नाही" असा आपला अभिप्राय व्यक्त केला आहे (आ. चौथी, पुणे १९६६, पृ. ७३). प्रथमा (कर्तृकारक) —प्रत्यय नाहीत आणि संबोधन—, नो, असेही त्यांनी प्रत्ययांच्या बाबतीत सांगितले आहे.

कृ. पां. कुळकर्णी हे **'मराठी भाषा उद्‌गम व विकास'** मध्ये लिहितात :—"संस्कृत प्रमाणे मराठीत (संबोधन वगळून) विभक्ती सात आहेत असे मानितात. . मराठीत प्रथमा विभक्तीचे प्रत्यय नाहीत." (चतुर्थावृत्ती, पुणे १९६३, पृ. ३७१–७२).

अरविंद मंगरूळकर यांनी **'मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार'** मध्ये विभक्तिविमर्श करतांना काढलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत :—

"(१) अर्थैकत्व हे एकविभक्तिकत्वाचे कारण आहे.
(२) अर्थैकत्व असता वर्णभेद हे प्रत्यय भेदाचे कारण आहे.
(३) अर्थैकत्व असता वचनभेद हे एकविभक्तिकत्वाचे कारण आहे.
म्हणजेच विभक्तिभिन्नतेच्या बाबतीत वचनभेद अकिंचित्कर आहे.
(४) अर्थभेद हे विभक्तिभेदाचे कारण आहे."

पुढे अधिक स्पष्टीकरण करताना शास्त्राचा काटेकोरपणा आणण्यासाठी मंगरूळकरांनी समीकरणाच्या स्वरूपात मांडणी केली आहे ती अशी :—

"समानवचनत्व असता—
(१) वर्णभेद + अर्थभेद = विभक्तिभेद;
(२) वर्णभेद + ० = समानविभक्ति (परिवृत्तिसहत्व);
(३) ० + अर्थभेद = समानविभक्ती



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यातले पहिले समीकरण निरपवाद आहे. दुसरेही समीकरण तसेच निरपवाद आहे. तिसरे समीकरण मात्र चर्चनीय आहे."

(प्रथमावृत्ती, पुणे १९६४, पृ. ११५–१६). "एकवचनात प्रथमेला प्रत्यय नाहीत. एकविधतेसाठी तेथे '०' प्रत्यय मानणे युक्त होय. अनेकवचनातही प्रथमेला '०' प्रत्यय मानिला पाहिजे" (पृ. १४१). आणि "संबोधनाला स्वतंत्र प्रत्यय आहेत. त्यांना पुढे विकृती होत नाही. कसाही असो, त्यांचा वाक्यगत घटकांशी अन्वय होतो. त्याचे प्रत्यय नामांना लागतात. या कारणांस्तव त्याचा विभक्तीमध्ये अंतर्भाव करावा" (पृ. १३७). अशा प्रकारचा युक्तीवाद करून प्रा. मंगरूळकरांनी प्रथमा व संबोधन या विभक्तींची पुढील प्रत्यय दिले आहेत.

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| **प्रथमा** | **०** | **०, आ, ई, ई, ए . . .** |
| **संबोधन** | **०, आ. या, ई, ए. . . . .** | **नो** |

आपल्या या नव्या व्यवस्थेचा विशेष म्हणून मंगरूळकरांनी अभ्यासकांचे लक्ष वेधले आहे :— "संबोधनाचा विभक्तीमध्ये अंतर्भाव केलेला आहे, आणि प्रथमा विभक्तीचे प्रत्यय दिले आहेत" (पृ. १४४). "बहुतेक वैयाकरण प्रथमेला प्रत्यय देत नाहीत, पण तिचे विभक्तिस्थान ठेवितात. अशा प्रकारचे वैलक्षण्य दाखविण्याने लाभ नाही" (पृष्ठ १४१), असेही त्यांनी प्रस्तुत संदर्भात समर्थन केले आहे.

प्रा. मंगरूळकर यांनी प्रथमा विभक्तीचे अनेकवचनाचे प्रत्यय जे ०, आ, ई, ए असे दिले आहेत, तेच संबोधनाच्या एकवचनाचेही प्रत्यय आहेत. येथे **वचनभेद आहे**, म्हणजे **समानवचनत्व नाही**, हे उघडच आहे. पण, '० + अर्थभेद = समानविभक्ती' या समीकरणाची ओढाताण करावी लागते त्याचे काय ? प्रथमेच्या बाबतीत "वैलक्षण्य दाखविण्याने लाभ नाही," असे मानावयाचे आणि प्रथमा व संबोधन यांच्या प्रत्ययांमध्ये वर्णभेद नाही, तर केवळ अर्थभेद आहे अशी वस्तुस्थिती स्पष्टपणे दिसत असतानाही विभक्तिभेद मानावयाचा हे एक प्रकारचे वैलक्षण्यच नाही काय ? या आक्षेपाच्या संदर्भात विभक्तिविमर्शाचा पुर्नविचार होणे आवश्यक आहे, एवढेच येथे सुचवायचे आहे.

या लेखाच्या उचित समारोपासाठी वेगळ्या संदर्भात व्यक्त झालेला एका जाणकार अभ्यासकाचा आलंकारिक अभिप्राय उद्धृत करावासा वाटतो :—

"एकाद्या चालू भाषेचे व्याकरण म्हटले म्हणजे त्याची स्थिती घराच्या भाडेचिठीसारखी असते. भाडेकऱ्यास घर रहावयास दिले असता त्याचा निरंतरचा हक्क उत्पन्न होऊ नये म्हणून ज्याप्रमाणे भाडेचिठी वारंवार नवी जुनी करून घ्यावी लागते, त्याप्रमाणे व्याकरणातही भाषेच्या वाढीप्रमाणे वारंवार नवे जुने करून घ्यावयाचे असते. तेव्हा भाषेच्या व्याकरणशास्त्राकडे विद्वानांचे निरंतर लक्ष असले पाहिजे. भाषेच्या व्याकरणाकडे विद्वानांचे लक्ष राहून जे भाषेचे नियमशास्त्र ते भाषेच्या प्रगतीस साह्यभूत अशा स्थितीत निरंतर राहील अशी व्यवस्था राहिली पाहिजे" [कृष्णशास्त्री चिपळूणकरकृत 'मराठी व्याकरणावरील निबंध' आ. तिसरी, पुणे १९२३, प्रस्तावना (ही कृ. चिपळूणकर, किंवा रा. भि. जोशी यांची नसावी) पृ. १५–१६].

## कृष्णदास मुद्गलाच्या रामायणाचा चिकित्सक अभ्यास

विदर्भ साहित्य संघाच्या एक आजीव सदस्या प्रा. सौ. चेतना क. दुरगकर यांचा वरील शीर्षकाचा संशोधन-पर प्रबंध नागपूर विद्यापीठाने नुकताच मराठीतील पीएच्. डी. पदवीसाठी मान्य केला असून त्यासाठी सौ. दुरगकर यांना नागपूर विद्यापीठातील स्नातकोत्तर मराठी विभागाचे प्रमुख डॉ. वि. वा. प्रभुदेसाई यांचे मार्ग-दर्शन लाभले होते. एका जेष्ठ मर्मज्ञाने प्रस्तुत अभ्यासाचे वैशिष्टय समर्पकपणे विशद केले आहे ते असे :— "एका विशेष ज्ञात असलेल्या कवीच्या तितक्याच अज्ञात काव्याचा घेतलेला हा चिकित्सक व तौलनिक परामर्श सोळाव्या शतकातील मराठी काव्याच्या अभ्यासात एक महत्त्वाची नवी भर टाकणारा आहे. प्रबंधातील सारे विवेचन साधार व साक्षेपी आहे. किंबहुना सर्वसामान्य अभ्यासकाला फारसे परिचित नसलेले असे एक महत्त्वाचे काव्य व त्याची रचना करणारा कवी, यांना प्रकाशात आणल्याबद्दल प्रा. सौ. दुरगकर आणि त्यांचे मार्गदर्शक प्रा. डॉ. प्रभुदेसाई हे दोघे निःसंशय अभिनंदनास पात्र आहेत."



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

## श्रीनिवास रामचंद्र सिरास / ग. त्र्यं. माडखोलकर व माडखोलकराविषयक दोन पुस्तके

प्रस्तुत लेखात ग. त्र्यं. माडखोलकर आणि माडखोलकरविषयक अशा दोन ग्रंथांचे परीक्षण केले आहे. दीर्घ कालावधीच्या आजारपणानंतर भाऊसाहेब माडखोलकर गेल्या वर्षी २७ नोव्हेंबर १९७६ रोजी कालवश झाले. त्या अगोदर भाऊसाहेबांनी लिहून प्रसिद्ध केलेली 'अकेला' ही एक कादंबरी. मध्यांतरी हीच त्यांची अखेरची कादंबरी मानली जाते. भाऊसाहेबांचे एक अतिशय जिव्हाळ्याचे जुने मित्र प्रा. वि. ह. कुळकर्णी 'लोकराज्य' मधील आपल्या श्रद्धांजलीपर लेखात अशी माहिती देतात :—"त्यांची जवळ जवळ शेवटची कादंबरी 'अकेला' ही तर त्यांचा एकवेळी लेखनिक असलेला दत्ता चक्रे या दलित वर्गातल्या कर्तबगार तरुणावर लिहिलेली असून त्यात भाऊराव दलित वर्गाशी किती समरस झाले होते याचा पुरावाच आहे." प्रा. कुळकर्णी हे स्वतः एक टीकाचार असतानादेखील त्यांनी जिला कादंबरी म्हटले आहे तिला वस्तुतः भाऊसाहेब स्वतःच 'कादंबरी' म्हणायला राजी नाहीत. ते 'अकेला' या नावाने प्रसिद्ध झालेल्या लिखाणाला कादंबरी मानीत नाहीत या गोष्टीचा मुद्दाम निर्देश करावासा वाटतो. त्यांच्या मते त्यांनी याला 'भावनिका' हे त्यांच्याच 'विलापिका' या रचनेच्या धर्तीवर दुसरे नाव दिले आणि वाचकांना ते न पटणारे आहे याची संपूर्ण खात्री ठेवूनच प्रास्तविकात वाचकांची त्याबद्दल क्षमा मागितली.

'अकेला' ही जशी रूढ अर्थाने कादंबरी नाही तसेच ते मनोरंजक लिखाणही नव्हे. त्याशिवाय 'अकेला' लिहिण्याअगोदर भाऊसाहेबांनी 'दोन तपे' व 'एका निर्वासिताची कहाणी' ही आत्मकथनपर दोन आत्मवृत्ते लिहिलेली आहेत. फरक फक्त इतकाच की या दोन आत्मकथनांमधून भाऊसाहेबांना स्वतःला पोहचलेली सामाजिक विद्वेषाची व प्रक्षोभाची झळ प्रगट करायची होती तर 'अकेला' मधून त्यांना त्यांच्या मानसिक कुचंबणेचे दर्शन घडवायचे आहे हे स्पष्टच दिसते. शिवाय ही झळ नाट्यमिश्रित आहे व म्हणूनच प्रत्यक्षातील व्यक्तीचे काल्पनिक नामकरण करणे त्यांना भाग पडले. कारण मध्यमवर्गीयांची डाळ सामान्यपणे ज्यापुढे शिजणार नाही अशा वर्णव्यवस्थेशी या मानसिक झळीचा संबंध आहे. म्हणूनच त्यासाठी भाऊसाहेबांनी 'भावनिका' या अभिनव लेखनप्रकाराचा आधार घेतला.

या पुस्तकातील सर्वच पात्रे ही माडखोलकर परिवारातील आहेत. यातून स्पष्टच झाले की 'अकेला' मधून दलित वर्गासाठी आपण केलेले काम लोकांच्या नजरेसमोर यावे हा माडखोलकरांचा उद्देश होता. हा उद्देश कादंबरीच्या अपेक्षित उद्देशाच्या मानाने गौण ठरतो. तसेच मुळातून दलित वर्गातून आलेला मनस्वी विद्यार्थी ज्या लेखकाच्या बंगल्यात वावरतो, तिथल्या वातावरणाचा जवळपास ८–१० महिने अनुभव घेतो, त्याच्यावर तिथल्या सुसंस्कारित व्यक्तींचा काही एक परिणाम होत नाही ही गोष्ट सुजाण वाचकाला पटू शकणारी नाही. हा नायक दलितांच्या कॉलेजमध्येच प्रवेश घेणार. आजपावेतो ही गोष्ट ठीक होती. पण भाऊसाहेबांनी काळाच्या बदलाकडे पाठच फिरविली. नायक डॉ. आंबेडकर कॉलेजातच प्रवेश घेतो याचे कारण त्याला हिस्लॉप कॉलेजचे वातावरण मान्य नसावे. साहजिकच त्यातून भाऊसाहेबांना तथाकथित राजकारण 'कादंबरीत' आणणे सुलभ झाले. कारण या नायकाला आधुनिक महाविद्यालयीन शिक्षणात मुळीच रस नव्हता. तरीही शिक्षण क्षेत्रात माजलेल्या जातिभेदावर आधारित राजकारणाची त्याला खूप ओढ वाटत होती.

'अकेला' च्या निर्मितीमध्ये लेखक अगदीच अयशस्वी झालेत असे नाही. भाऊसाहेबांच्यासारखा लेखक आपल्याच घरातल्या माणसांचे चित्र रंगविण्यात असफल झालेला आहे. याउलट त्यांच्या लेखनातील संयमी गांभीर्याचा हातखंडा वापर याही कादंबरीत प्रकर्षाने जाणवतो. मुळातली प्रमुख नायकाची व्यक्तिरेखा



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चढली होती. ती घात घालू लागली. तो आवर्जून, ओरडून लोकांना सांगायचा (-लोक त्याच्या समोर असायचे की नाही कुणास माहित स्मशानाला उद्देशून बोलत असेल तो-)" "मोझेझने राष्ट्रकार्याची हानी केली. दगा दिला. मोझेझने सैन्याला चिथावणी दिली. शिपायांना चिथावणी दिली. मोझेझ लोकांना भडकवू लागला. संपाची उठावणी करू लागला. त्याला फॅरोचं राज्य उलथून पाडायचं होतं. मोझेझ इजिप्तचा शत्रू आहे. मोझेझ लोकांचा शत्रू आहे."

मग त्याच्या भाषेत बदल होऊ लागला. फॅरोने तसा बदल करायला सांगितलं असावं. तो म्हणायचा, "आता चांगले दिवस आले आहेत. चोरांचा चाच्यांचा उपद्रव समूळ नाहीसा झाला आहे. कुठे मारामाऱ्या नाहीत. दंगे धोपे नाहीत. सर्वत्र शिस्त आहे. शांतता आहे. उत्पादन वाढलं आहे. लोक फॅरोला आग्रह करताहेत की ही शिस्त आणि हे फायदे कायम स्वरूपांत टिकले पाहिजेत."

जेलरला विचारलं, "हे खरं आहे ?"

तो म्हणाला, "या उलट कधी काही ऐकलं नाही. तेव्हा हेच खरं मानायचं,"

तुरुंगात कुणी नवा आला की सारेच जण त्याला विचारायचे तो अमका कुठे आहे ? आता काय करतो ?

उत्तर यायचं - तो अमुक अमुक ना ? बऱ्याच दिवसांत दिसला नाही. तो कुठे असेल ते फॅरो जाणे ! मी इथे आलो आहे हेही माघारी कुणाला माहीत नाही.

चकमकी झाल्याच्या वार्ता उठायच्या. चकमकींत तर पुष्कळ जण मारले जायचे. प्रश्न पडायचा, यांनी शस्त्रे आणली असतील कुठून ? कुणाची माता, कुणाची पत्नी, कुणाची बहीण वा मुलगी अश्रुभरले डोळे टिपून सांगायची, "चकमकी झाल्याच नव्हत्या. फॅरोच्या शिपायांनी असहाय बंद्यांचे केलेले ते निर्घृण खून होते."

मग तरुणांची माथी भडकायची. हिंसाचार करून फॅरोला धावरवावं असा विचार त्यांच्या मनात यायचा. धाडस करून ते आपले प्रश्न आपल्या योजना मला तुरुंगात कळवायचे. सल्ला विचारायचे. मी नकार कळवायचा. मग ते संतापून म्हणायचे "अहिंसेची महत्ता सांगायची असेल तुम्हाला ? भ्याड कुठले !"

अंधारात मला खूपसं काही दिसायचं. प्रकाशकिरणंही. मग मन मोकळे करून मी माझ्या लोकांना तुरुंगातून लिहायचं ठरवलं. लिहिलं–अहिंसा तत्वाचा नीति तत्व म्हणून विचार करू नका. पण एक धोरण म्हणून करा. हिंसेचा अवलंब करायचा म्हटला तर तुम्ही किती साथीदार होऊ शकता ? दहापाच. ऐन प्रसंगी दहा पैकी नऊ उणे पडतात. एक स्फोट होतो. पुढे अंधार ! अहिंसेचा मार्ग राजरस्त्याइतका ऐसपैस रुंद आहे. आपल्या लढ्यासाठी शेकडो, हजारो, लाखो लोक ह्या राजरस्त्यावर अखंडपणे चालू शकतात. इथे मरताना तुम्ही कदापिही एकटे राहणार नाही. अहिंसेच्या मार्गावरून जाताना पुरुष आणि स्त्रिया, मुले आणि वृद्ध सारेच लढा लढू शकतात. शूर, साहसी आणि पराक्रमी ठरू शकतात. फॅरो हरेल. कदाचित् हे घडायला दीर्घ काळ लागेल. प्रहार करता करता अखेर त्याचेच हात दमतील. दम उखडेल. त्याचंच पाप त्याला खाऊ लागेल. सुखशांतीला तो कायमचा वंचित होईल. आणि रौरव नरकाची भीती त्याला भेडसावील. शासनाचं बळ त्याच्या शस्त्रांत आहे. माणसाचं बळ त्याच्या अपरिमित कष्ट, क्लेश, शिक्षा, दंड सोसण्याच्या शक्तीत आहे. शासन विरुद्ध माणूस हा लढा प्रत्येक पिढीला नव्याने लढावा लागणार आहे. तो कसा लढायचा ह्याचा नमुना तुम्ही आम्ही, आज घडवू या."

ह्याची प्रतिक्रिया मला फारशी कळली नाही. फॅरो सतत हिंसाचाराचा आरोप करायचा. हिंसाचाराच्या खटल्यात त्याच्या सत्ताविरोधकांना गोवायचा. आणि राजद्रोहाच्या आरोपाखाली त्यांना फाशी द्यायचा. हे सत्र अखंड चालले होतं.



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

सर्वत्र आबादीआबाद आहे असं फॅरो म्हणायचा. पण दुर्भिक्षाचा प्रत्यय सर्वांना यायचा. आसुडाच्या भीतीने गुलाम राबराब राबायचे. पूर्वीपेक्षाही जास्त. पण तरी बघणाऱ्याला जाणवायचं की पीक पूर्वीच्या मानाने आता फार कमी येत आहे. दुष्काळ पडायचे. फॅरो म्हणायचा-मरा लेक हो ! इमानानं काम केलं असतं तर दुष्काळापुरता साठा जमला असता ! पण भुकेने मरायला तयार होण्यापूर्वी लोक फॅरोची गुदामं फोडायचे. आणि मग फॅरोलाही लोकांबरोबर दुष्काळाचा तडाखा जाणवायचा.

पाप झालं म्हणजे रोगराई येते अशी लोकांची समजूत होती. फॅरोच्या मनावरही ह्या समजुतीचा जबरदस्त पगडा होता. अशीच एक जबरदस्त साथ आली. आणि तीत फॅरोचा एकुलता एक मुलगा मेला. फॅरोने लोकांविरूद्ध युद्ध पुकारलं होतं तेव्हापासून तो अधिकच धार्मिक झाला होता. शासन धर्मपुरस्कारार्थ सारखं राबवलं जात होतं. सरकारीरीत्या धर्मपाठ व्हायचे. प्रभुनामाचा गजर चालायचा. नियमित मंत्रजागर व्हायचा. ते लोकांना दूरवर ऐकविण्याची खास सोय करण्यांत आली होती. फॅरोने खास माणसं नेमली होती. ती भजनकीर्तन करायची. देवांच मोठेपण सांगायची. देव फॅरोचा होता. ह्या उपक्रमांचं सातत्यच केवळ फॅरोने वाढवलं नव्हतं तर त्यांना अधिक रुबाब आणि गांभीर्य आणलं होतं. तिथे माणूस पोहचला की नतमस्तक होई. देवापुढे आणि फॅरोपुढे.

गुलामांना स्वतःचा देव नव्हता. स्वतःचा धर्म नव्हता. ह्याची त्यांना खंत होती. त्यामुळे त्यांच्यात न्यूनगंडही उत्पन्न झालेला होता. फॅरोच्या दृष्टीने मोझेझ एकटा त्याचा शत्रू होता. गुलाम त्याच्यापुढे, त्याच्या देवापुढे लीन झाले तर ते त्याला प्रिय होते. आता उदार होऊन फॅरोने पावित्र्य रेषेच्या पलीकडे जमा व्हायला आणि श्रवणसौख्य घ्यायला गुलामांना परवानगी दिलेली होती. परिणाम ?

फॅरोविरूद्ध बंड केलं तर ते देवाविरूद्धच बंड होईल ह्या धारणेच्या आहारी सारे गेले. त्यांनी नव्यानं फॅरोपुढे लोळण घेतली. फॅरोच्या चरणाला स्पर्श करायला मिळणं ही त्यांच्या दृष्टीनं परम् भाग्याची गोष्ट होती. फॅरो म्हणजे देव. देव म्हणजे फॅरो.

फॅरोचा आपल्या देवावरचा विश्वास आता परमकोटीला पोहोचला. तो करीत होता ते राष्ट्रकार्यच नव्हतं तर त्याच्या दृष्टीने देवकार्य होतं व देव त्याच्या पाठीशी उभा होता. त्याला कुणाला भिण्याचं कारण नव्हतं मोझेझला तर नव्हेच नव्हे. तो म्हणायचाच - माझ्याविरुद्ध बंड करणारी अहंमन्य माणसं फक्त पांचपंचवीस भरतील. ती नगण्य आहेत. देव माझा पाठीराखा आहे आणि लोक माझे भजक पूजक आहेत !

"माझा मुलगा मरूं शकत नाही. कुणा दुष्टाची दृष्ट लागली म्हणून तो मेला असेल तर माझा सर्वशक्तिमान देव त्याला जिवंत करील." फॅरो गरजला.

देव असं करतो हे, धर्मगुरु एका पाठोपाठ एक अनेक उदाहरणे देत, प्रत्येक कथाकीर्तनातून सांगायचे. फॅरोही त्या श्रद्धेने भारला होता.

मृत मुलाला आपल्या देवासमोर ठेवून फॅरोने अनुष्ठान मांडलं. मुलगा आता जिवंत होईल, मग होईल म्हणून अनिमिष नेत्रांनी देवाकडे बघत तो उभा राहिला.

दिवस गेला. रात्रही सरू लागली. सारे धर्मगुरु तिष्ठत उभे होते. फटफटायला लागलं तसा, मला पूर्वी भेटलेला धर्मगुरु फॅरोला म्हणाला, "महाराज हा संघर्ष देवादेवामधला दिसतो आहे. दुसऱ्या कुणाच्या देवाने तुमच्या देवाला हतबल केलेलं आहे."

"असं म्हणता ?" चिंताकुल आवाजात फॅरो बोलला. "कुणाचा देव असेल बरं तो ?"

"दुसऱ्या कुणाचा असणार ! मोझेझचाच." तो धर्मगुरु म्हणाला. ते उद्गार ऐकले आणि फॅरो हादरला.

"महाराज, मला अनुज्ञा द्यावी. मी मोझेझला आणतो इथे." धर्मगुरु म्हणाला. आणि तडक तुरुंगात माझ्याकडे आला. म्हणाला, "मोझेझ, तुझ्या देवाने फॅरोच्या देवावर मात केलेली दिसते आहे."



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"तुम्हालाही वाटतं असं ?" मी विचारलं. "होय." धर्मगुरू म्हणाला.

"आणि फॅरोला ?" "तुम्ही तुमच्या देवाची महत्ता फॅरोना पटवा. ह्या मनःस्थितीत त्यांना ती पटेल."

"मी काय चमत्कार केलेत तर फॅरोला माझ्या देवाची महत्ता पटेल ?"

"हा दंड फॅरोपुढे फेक. त्याचं नागात रूपांतर होऊ दे. हा तुझा दंड नाईलच्या पाण्यात बुचकळ. पाण्याचं रूपांतर रक्तात होऊ दे. फॅरोच्या देवमूर्तीच्या तोंडातून रक्ताची धार लागू दे. मंत्रून मूठ मार. घुराच्या लोटाप्रमाणे मृत्यु पसरू दे आणि माणसं पटापट मरू दे. तुझ्या देवाचं सामर्थ्य पटलं की पुरे."

"नाही धर्मगुरु. मी हे करू शकत नाही. माझा देव हे कदापीही करणार नाही."

"मग मोझेझ, फॅरोच्या मुलाला एकदम जिवंत कर. बस्स !"

तुरुंगाची दारं माझ्यासाठी उघडी झाली. मी आणि धर्मगुरु राजवड्याच्या दिशेने चालू लागलो.

फॅरोच्या नवनिर्मितीचं कार्य पूर्वीपेक्षाही उत्तम चाललं आहे. असं तुरुंगांत ऐकत आलो होतो. पण बघतो तर अर्धवट कामं पूर्वी होती तशीच पडलेली होती. वाळूचे लोट जमले होते व काही वास्तू वीत वीत वाळूच्या थराखाली झाकल्या गेल्या होत्या. चहूकडे दैन्य होतं ते पूर्वीसारखंच. गुलाम जिवापाड राबत होते खरे. पण कामाला वेग नव्हता. ज्याच्याकडे बघावं त्याच्या चेहऱ्यावर भीतीचं दाट धुकं जमलेलं. काही जण धावले. माझ्या चरणावर लोळण घेऊ लागले. किती विनवलं - बाबारे असं करू नका ! तुम्हाला शासनाविरुद्ध माणूस म्हणून लढायचं आहे. जोपर्यंत तुमच्यांत ही लोळणघेण्याची प्रवृत्ती आहे तोपर्यंत तुम्ही माणूस म्हणून ताठ होऊच शकणार नाही !

नाही ऐकले कुणी. काल फॅरोपुढे लोळण. आज माझ्यापुढे. उद्या आणखी कुणापुढे.

जाऊन पोहोचलो त्याबरोबर फॅरो उठला. त्याने दृष्टी दुसरीकडे वळवली व बाजूस झाला.

मुलाचा हात उचलून पाहिला. काष्ठवत् झालेला होता. तसंच सारं शरीर.

म्हणालो, "फॅरो, काही उपयोग नाही आता. फार उशीर झाला. "

फॅरो माझ्याकडे वळला. म्हणाला, "माझा देव हरला आहे. मोझेझ, तुझ्या देवाला आता त्याला जिवंत करू दे."

मी म्हणालो, "मी गुलाम आहे फॅरो. मला देव नाही.

फॅरोने विचारलं, "तुला मी तुझ्यापुढे शरण यायला हवा आहे का ? मला माहीत आहे मोझेझ. तुला देव आहे. तुझ्याजवळ देव आहे. आणि तो माझ्या देवाहून अधिक प्रभावी आहे. ऐक तूही कुणाचा तरी बाप आहेस. एक बाप तुला ही गळ घालतो आहे. "

मन भरून आलं. फॅरोच्या पाठीवर प्रेमाने हात ठेवला. येवढंच म्हणालो, "फॅरो, तुझा मुलगा देवाघरीच गेला आहे. आता शोक करू नकोस. "

आता सारंच चित्र बदललं. मी बाहेर आलो. आणि बघतो तो गुलाम मुक्त केले गेलेले. त्यांना आपण मुक्त झालो आहोत म्हणजे नेमकं काय झालं आहे हेच कळत नव्हत. पण आनंदले होते. त्यांच्या उत्साहाला आणि आनंदाला उधाण आलं होतं आणि सारखे माझ्या नावाचा जयजयकार करीत होते. सारं शहर लोटलं माझ्याभोवती गर्दी करायला.

फॅरो आपल्या रथातून आपल्या प्रजाजनांपुढे आला. म्हणाला, "लोकहो, माझ्या अधिकाऱ्यांनी, शिपायांनी जे अतिरेक केले त्याचं दुःख आहे मला. दमननीतीचा अवलंब करून तुम्हांला कामाला जुंपण्यात अर्थ नाही हेही मला कळत होतं. पण मला इजिप्तचा उत्कर्ष साधायचा होता. नवनिर्मितीचं स्वप्न प्रत्यक्षांत उतरवायचं होतं. गोरगरिबांना कामधंदा द्यायचा होता आणि भाकरी पुरवायची होती. म्हणून मी विरोधकांना खच्ची केलं. माझं चुकलं असं मला अजूनही वाटत नाही. मोझेझला मी पूर्वीही म्हणालो



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होतो - नवनिर्माण कार्याची सूत्रं तू हाती घे. आज मोझेझला पुन्हा तेच आमंत्रण देतो. हा अध्याय आपण संपवू या आणि निर्धाराने इजिप्तच्या नवनिर्माण कार्याला जुंपून घेऊ या."

प्रजेने प्रतिसाद दिला नाही. कित्येक जण माझ्याकडे बघत राहिले.

फॅरोने विचारलं, "मोझेझ, स्वीकारणार का तू माझा प्रस्ताव ?"

"नाही. " मी उत्तरलो.

फॅरोने प्रजेला विचारलं, " तुम्हाला इजिप्तच्या उत्कर्षासाठी तळमळणारा फॅरो हवा की ज्यानं विध्वंसनाचा विडा उचलला आहे तो मोझेझ हवा ?"

साऱ्यांनी एकदम एका आवाजात उत्तर दिलं, "मोझेझ."

फॅरोच्या वर्तनाचा परिणाम असा झाला होता की गुलाम आणि अन्य प्रजा असा भेद मिटला होता व सारेच फॅरोविरुद्ध एकवटलेले होते.

फॅरोचा रथ माघारी वळला. क्षणार्धात चित्र पालटलं. फॅरो एकटा उरला. त्याची बायकोही त्याच्याशी इमान राखणारी नव्हती. दरवाऱ्यांनीही फॅरोकडे पाठ फिरवली.

गुलामांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु झिरपत होते. हा असा आनंदाचा क्षण यावा आणि बघायला मिळावा ह्यांत साऱ्या जन्माची सार्थकता सामावलेली होती. इजिप्त स्वतंत्र झाला होता. गुलामगिरी नष्ट झाली होती. सारे लोक समान झाले होते. मी गुलामांचा नेता उरलो नव्हतो. लोकनेता बनलो होतो.

फॅरोसाठी त्याचा राजवाडा होता. प्रजेसाठी सारा इजिप्त होता. आता त्यांचं राज्य त्यांनी चालवायचं होतं. उत्साहाला उधाण आलं. गुलाम नागरिक झाले. सारे नागरिक समान झाले. आणि फॅरोचे दरबारी त्यांच्यांत येऊन सामील झाले. त्यांच्याबरोबर नाचले. मिरवले. स्वातंत्र्याचा आनंद काही और असतो म्हणून गळ्यात गळे घालू लागले.

साऱ्यांनी आग्रह धरला, "मोझेझदेव, आपण आता फॅरो व्हावे."

मी म्हणालो, "प्रजेने राजा व्हावे ह्याचा मी ध्यास घेतला होता. तुम्ही सारे एक होऊन राज्य करा. म्हणजे स्वातंत्र्याला रंगरूप आकार येईल. राज्य व्यक्तीचं नसावं. गटाचही नसावं. लोकाधिकारावर अधिष्ठित असलेल्या कायद्यांचं असावं. आणि माणसांवर, त्याने स्वतः निर्माण केलेल्या कायद्याची सत्ता चालावी. "

वरोवर आहे म्हणाले. टाळ्या दिल्या. माझ्या नावाचा जयजयकार केला. सगळं कांही झालं. हळूहळू जसा साऱ्यांना फॅरोचा विसर पडला तसाच, त्याचबरोबर माझाही विसर पडू लागला. पूर्वी माझे विचार ऐकायला ते उत्सुक तरी असायचे. आता उत्सुकताही उरलेली नव्हती. त्यांनी त्यांच्यांतल्याच एकाला फॅरो केला. आणि त्याच्यासाठी नवा राजवाडा बांधला.

काल फॅरोच्या दरबारी असलेले, आजच्या प्रजेच्या राज्यात राज्यकर्ते झाले. सत्ताकांक्षींचंच एक कोंडाळं तयार झालं. राज्यघटनेचा विचार सत्ताकांक्षीच्याच दृष्टिकोनांतून झाला. सत्यदेव स्थापायचा. आहे म्हणायचे. आणि ठायी ठायी सत्ताकांक्षी, सत्तादेव उभे करायचे सोन्याचे देव. सोन्याने मढवलेले देव. आणि त्यांच्यापुढे आणून ओतलेल्या सोन्याच्या राशी. हीच त्यांची वैभवाची कल्पना होती. त्याचंच नाव राजवैभव होतं. आणि प्रजा तेथे लोटांगण घालीत असायची. तसेच ते वैभव डोळे भरून बघण्यासाठी गोरगरीब जीव टाकायचे.

गुलाम स्वतंत्र झाले होते खरे पण त्यांचं रुपांतर लाचार भिकाऱ्यात झालं होतं. अहोरात्र त्यांना एकच ध्यास. राज्यकर्त्यांच्या पुढे मागण्या घेऊन उभे राहायचं. कुणी विनवायचं. हिसकाहिसकीपर्यंत त्याची मजल जायची. भिकाऱ्यांच्या तऱ्हा न् तऱ्हा बोकाळल्या. प्रजेच्याच संमतीने शासन प्रबळ होऊ लागलं. करड्या राजाच्या उदयासाठी लोक आतुर झाले. गुलामगिरीचा वारसा बापाकडून



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुलाकडे पोहोचू लागला. गुलामगिरीचं नीतिशास्त्र बाप मुलाला शिकवू लागला. प्रजेला राजा बनणें जमलं नाही. स्वत:च्या समस्या स्वत: एकत्र येऊन सारासार विचाराने सोडविण्यास कुणीच प्रवृत्त झालं नाही. स्वातंत्र्य पालथ्या घड्यावर पडलं. वाहून गेलं. मला वैताग आला. त्याच भरात एका शिळेवर 'देवाच्या दश आज्ञा' असं शीर्षक देऊन स्वातंत्र्य, समता, न्यायबुद्धी व ऐहिकतावाद ही तत्वें कोरून काढली. शासन विरुद्ध माणूस ह्या अखंड संघर्षाच्या संदर्भात त्याचा अर्थ काय हेही थोडक्यात विशद केलं. स्वावलंबन, कष्ट, सहकार, शिस्त, सत्य आणि प्रेम या सहांची त्या चतु:सूत्रीला जोड देऊन दहाचा आकडा पूर्ण केला. संतापाच्या भरात ती त्या मूर्खांच्या घोळक्यात नेऊन आपटली. त्यांनी ती आदराने उचलली. उभी केली. तिच्या भोवती देऊळ बांधलं. तिथे पूजापाठ सुरू केले आणि मला मरायची मोकळीक दिली. जग जगू लागलं नेहमी सारखं. माझे केस पिकले होते. गात्रं शिथिल झाली होती. डोळ्यांतला स्वप्नाळूपणा वाढला होता. वास्तव दिसेनासं होऊ लागलं होतं. अलीकडे हिला मी, आणि मला ही, दोघंच एकमेकांना उरलो होतो. मुलांचं विश्व वेगळं होतं. जग जसं होतं. तसे ते होते.

दंड उचलला. निघालो. तिनं माझा हात धरला. मी म्हणालो, "निर्वाणास निघालो आहे."

"म्हणूनच हात धरला आहे. तुमच्या सांगाती चलायला." ती म्हणाली.

निघालो. सावली कधी पुढे चालायची. कधी मागे मागे रेंगाळत यायची. मीही तिला बघत होतो. हीही.

मी म्हणालो, "आपल्या एकांताचा भंग करायला सावली आहे बघ."

"असू दे." माझी सहचरी म्हणाली.

"मृत्युपथावरून चालताना कसं वाटतं?" मी विचारलं.

"फार चांगलं. तुमच्याबरोबर चालणं म्हणजे जगणं. तुमच्याविना राहणे म्हणजे मरण. माझ्या रूपेरी केशसंभारावरून तुमचा ममतेचा हात फिरला आणि सुरकतलेल्या गालावरून बोटं, की स्वर्गसुख मिळतं" ती म्हणाली. विलगली.

तिच्याकडे माझ्या धूसर अंधुक दृष्टींतून बघितलं. प्रथम भेटली तेव्हाचा तो निरागस तजेला मला अजून तिच्या चर्येवर दिसत होता. ओठावर ओठ टेकले. म्हणालो, "अजून तुझे ओठ दवांनी ओलावलेल्या गुलाबपाकळीसारखेच आहेत"

आमची पावलं वेगानं पडू लागली. म्हणालो, "असंच चालता चालता एक दिवस मी निखळून पडेन"

ती म्हणाली, "मी त्याआधीच तुमच्यापुढे गेलेले असेन".

आता मी सावलीला म्हणालो, "बये तू आता माघारी फिर बघू. आमचं अवतारकार्य संपलं आहे म्हणून आम्ही आमच्या निर्वाणाला निघालो आहोत"

देव म्हणाला, "माझं ही अवतार कार्य संपलं आहे"

मी म्हणालो, "असं कसं म्हणतोस? पुन्हा नव्यानं शासन प्रबळ बनण्याची आणि माणूस गुलाम बनण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. तुला आमच्याबरोबर महानिर्वाणाला येऊन कसं चालेल?"

देव म्हणाला, "मोझेस, प्रत्येक पिढीला स्वातंत्र्यसंपादनासाठी हा असाच संघर्ष करावा लागणार आहे. पुढची पिढी आपल्या स्वातंत्र्यसंपादनाच्या लढ्याला जेव्हा प्रवृत्त होईल तेव्हा ती आपला देव स्वत: शोधील. तू मागे बघू नकोस. मीही मागे बघत नाही" सावलीही माझ्या मागोमाग येतच राहिली.



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(पृष्ठ २१४ वरुन)

"असू दे. मग काय बिघडलं ?"

"दलित म्हणजे पारंपारिक गुलामी. दलित म्हणजे दैन्य लाचारी. दलित म्हणजे महा भयंकर गुन्हा. . . पाप. . विटाळ ! दलित म्हणजे तिरस्कारिता, तुच्छता. 'दलित' म्हणजेच अस्पृश्यता ! आणि ही अस्पृश्यता हजारो साल लोटले तरी अजूनही जशीची तशी आहे."

"हो—आहे. एक कठोर वास्तवच तू बोलून दाखवलंस. पण— मला कळत नाही, तुझा धर्म घेतल्यावर तरी माझी अस्पृश्य—महार जात सुटणार आहे का ?"

—ती गप्पच झाली. जरा वेळानं गंभीर होऊन पुटपुटली—

"हं. . अस्सं तर ! . पण असं का—काय कारण ?"

"कारण हिंदू समाजाची माणुसकी कधी पणालाच लागली नाही. अस्पृश्यतेला धमास लावणारी समर्थ शक्ती जन्मालाच आली नाही. अहम्‌पणानं या भारत देशाला सनातन काळापासून ग्रासून टाकलेलंय . देश स्वतंत्र झाला. पण पाप्या-पितरांप्रमाणे पोटातल्या सर्व दलित जातीला त्यानं अजूनही परावलंबी—परतंत्रच ठेवलं. गुलाम ठेवलं. आम्ही या स्वतंत्र देशात स्वतंत्र नाही. खरे तर, आपला हा देश आम्ही आपला मानायलाच नको. येथील सामाजिक-आर्थिक व त्याहून मोठी—मानसिक गुलामी लादलेलं दलितांचं दुःख, ही सर्वस्वी जगावेगळी बाब आहे.

आशा, तुला हे आमचं दुःख समजणार नाही. आणि ते समजलं—कदाचित् तुझ्या विचार बुद्धीला आकळलं, जाणिवेत उतरलं तरी प्रत्यक्ष सोसाव्या लागणाऱ्या अंतःकरणातल्या यातनांची अनुभूती तुला येणं शक्य नाही".

"आय् यम् सॉरी मिस्टर मधु मेंढे. तुला एवढं लागेल, असं वाटलं नव्हतं".

"लागायचा प्रश्न नाही—ही हकिकत आहे. . येथील बौद्ध वा नवबौद्ध म्हणजेच दलित, असं समीकरण मांडणारे मांडोत, त्यात आम्हांला वाईट नाही. उलट 'दलित' म्हणून आम्हाला अभिमान आहे. कारण दलितांतही एक सिद्धहस्त तेज आहे. त्याला तेजस्वी इतिहास आहे. आणि 'दलित' अशी कोणी जात नसून तिला आम्ही आमच्या उत्क्रांतीची एक अवस्था मानतो. नाहीतरी मुळात माणसाला 'काही जात' असते, असावी—ही कल्पनाच बरोबर वाटत नाही. पण ती चिकटवून समाजाचा—या देशाचा मोठाच घापला केलेला आहे. . . माणूस जगत असताना कुठे जात असते ? तुझ्या माझ्या संबंधात—"

"तुझ्या समाजात हे खूप काही होत आहे. ही एकप्रकारची समाजक्रांतीच आहे !" आशा गंभीरपणे बोलली, "—विचार येतो वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या समाजाचा. संस्कृतीचा ! फार वाटते, ह्या समाजाला बौद्धिक तशा मानसिक परिवर्तनाची अगोदर गरज आहे. ते का घडून येत नाही ?"

"ते धर्म होऊ देत नाही. शास्त्र होऊ देत नाही. . एवढं थंड की परिवर्तनाची ही प्रक्रियाच गोठून गेल्यासारखी वाटते. प्रवाहच नाही. त्यामुळे या समाजाचं डोकं आणि हृदय एक होणं मुष्किल वाटते. ते ज्या दिवशी होईल—"

"माझ्याच बाबतीत बघ, मी धड भारतीय राहिले नाही, पूर्ण परकीयसुद्धा नाही. धड ब्राह्मण नाही, धड ख्रिश्चन नाही. मला माझी संस्कृती अशी नाहीच. भंकस सालं सगळं. जाऊ दे. मागेच समुद्रात टाकून आले" ती मुद्दा धरून पुन्हा विषयावर येत म्हणाली—"डॅडी इंग्लंडकडेच. . माझा विचार करताहेत मला ते पसंत नाही. . वैताग वाटतो. तरी मी उच्च कुळाची, वरिष्ठ जातीची व संस्कृतीची आहे ! आम्ही. मोठे श्रेष्ठ खरेच ! एवढे की भारतीय—खुजी—उपरी. . म्हणूनच असेल, मला इथल्या मित्रांचा विरंगुळा तेवढा मनमोकळा आनंद देतो. सुख देतो. . त्यातही तुझ्यासारखा मित्र. . सिरियस नि सिन्सियर. कोणतंही मन लावून करणारा. . खरेच, तू मला किती किती आवडतोस म्हणून सांगू !"—ती सुटली. आणि आता माझ्या गळ्यात हात आणि डोळ्यात डोळे घालून याचना करीत बोलली—



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"तुला कसं सांगू माय डियर. . .मायकल, माझं तुझ्यावर मनापासून प्रेम आहे रे ! . तुझं ? तुझंही. आता साथ हवी. देतोस ? आता दे. . .मला प्रेम दे !"

–ती अशी भलतीच प्रेमोत्सुक–उतावळी झालेली बघून मी लगेच तिच्या विळख्यातून स्वतःला सोडवलं. . .सगळं शारीरिक. .याच्याशी–त्याच्याशी अन् त्याच्याशीसुद्धा. .हे प्रेम ! साला, प्रत्येका-जवळ तेच साच्यातलं बोलत होती–'तू मला किती आवडतोस ! .मी मनापासून प्रेम करते'. माझी व तिची ही झालेली दैना मी पहात होतो. .भावविवशता ! ती पूर्ण डुबली होती.

.तिचं हे अफाट बेभान भावनाकर्षण मला कळत होतं. पण त्याचवेळी व यावेळी तिच्या आतल्या सगळ्या 'फिलिन्ज' मला कळून चुकल्या होत्या. ते खरंही होतं. . .तिनं बोलून दाखवल्याप्रमाणे–तिच्या सुखासीन संस्कृतीचा प्रांतच मुळात वेगळा. वरचा. माझा वेगळा–तळाचा. वरची हिरवळ तेवढी बघायची. नेत्रसुख अनुभवायचं. . .त्याच्या खालतीच्या दलितांच्या दलदल जगाची तिला काय कल्पना ! .मी तिच्याशी जर लग्नाचा विचार केलाही. .पण ती करील ? कदाचित् मागेपुढे तीसुद्धा तयार झाली तरी–ही मुळातच खिडारलेली आणि पुढे वाटेल त्यावेळी टरकणारी ही जुळणी होणं व ती टिकणं कसं शक्य आहे ? .मी विचार केला. निर्णय घेतला. .तिला लागेल. मग दुखावेल. पण आताच दुखावलेलं परवडेलही. पुढचा धोका बरा नाही. म्हणून मी आता सरळ सरळ तिला फुटवलं –

"आशा, तुझं-माझं जमायचं नाही. यापुढे तू. .तू रहा, मी माझ्यासगंच चालतो, . . .माझ्या मार्गानं–मला एकटयानंच गेलं पाहिजे. .माझं दुःखच वेगळं आहे. मी इथं माझ्या बापासमान भावाला आजपर्यंत हसवू शकलो नाही–म्हणजे काय ? .तिथं. .हे माझं मोठं दुःख आहे. .ते अनुभूतीशिवाय तुला कळायचं नाही, हे आणखी दुःख ! बस् यापुढे तू– मला नाटक जमत नाही. "–मी जरा आवेशातच बोलून गेलो.

"–नाटक काऽऽय ?"–ती मोठ्यानं चिडली, ओरडली. आणि चरफडत तिच्या चेहऱ्या-वरचा– तिनं काढलेला आपलाच असा संताप–वैताग–मी पहिल्यांदा पाहिला. त्यात ती मला इतकी मोहक वाटली की–

ती रागेजून– रूष्ट होऊन स्वतःशीच पुटपुटत निघूनही गेली तरी मी त्या दिशेने कितीतरी वेळ वेड्यासारखा पहात थांबलो. सर्व विसरून– तिलाच आठवत. . तिचं सुंदरपण. .आणि–

आता विकट स्वप्नातून जागा झाल्याप्रमाणे मी जोराने धसकलो. . कल्पनास्वप्न ! .पण छे, ह्या केवळ कल्पना नव्हत. स्वप्नरंजनसुद्धा नाही. . .काही पुढचा आणि बराच मागचा. .घडलेला खेळ. आणि तो आठवून माझ्या फत्तर होहून पडलेल्या अकलेचे पडदे सताड उघडले. मागच्या खेपेस आमचे असे बिनसले होते तर !

.काय जबर मोहिनी टाकली होती मायाविनीनं ! .मला पागल केलं होतं. तिनं आपला एवढा ध्यास लावला होता, की तिच्याशिवाय मला काही सुचत-आठवतच नव्हतं. सारं मन निष्क्रीय, गवाळं–गहाण करून टाकलं होतं. बस्, आता ठरवलं––

. . .बकरा नवसादी बळी मागणाऱ्या देवल्या-मावल्याप्रमाणे आपला 'भाव' खाणाऱ्या महागड्या 'पराया मालाला' हात लावू नये. . .नुसतं शरीर देणाऱ्या पण मन मैलोंसे दूर ठेवणाऱ्या आणि परसंस्कृतीत पोसलेल्या आशाच्या फंदात पडून आपल्याला आणखी बरबाद व्हायचं नाही. . .आपल्या समाजाशी बेईमान व्हायचं नाही. .समाजाचं आपण अवश्य काही देणं' लागतो, म्हणून समाजासाठी. .त्या अगोदर वहिनी–भावासाठी––त्यानं आपलं पुष्कळ केलं. आता आपण झिजायचं. त्याला थोडं तरी सुख द्यायचं––हसवायचं. .तो कधी हसला नाही. . . .



अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विचाराच्या तंद्रीतच मी वस्तीत येऊन पोहचलो. रात्रीचे अकरा तरी वाजले असतील. शिणलो होतो. आता फार भूक लागली असल्याचे जाणवले. . .आज पंधरा आगस्ट. मागच्या वेळेसारखं वहिनीनं घरात काही गोडधोड केलं असेल. नवऱ्याला घातलं असेल. . . .विचारा, वर्षासालाचं मनभर खाऊन आनंदला–आनंदानं झोपी गेला असेल. . .मी लाळ गिळत दाराजवळ जाताजाताच पुकारलं—"वैनी—"

आवाज आला नाही. चिरल्या दाराच्या फटीतून पाह्यलं. .आत घप्प अंधार ! .मला माझ्या जागेवर जायचा प्रश्नच पडला. (?) पंधरा आगष्टचा दिवस. लोकात नवी 'जान' टाकणारा—नवजीवन देणारा एवढा मोठा—भारताच्या भाग्याचा—सणा उत्सवाचा दिवस आणि घरात साधा दिवाही जळता नाही ? .वेडे ! .छे–छे, मीच वेडा ! . .लगेच माझ्या लक्षात आले,—आज हा आनंदाचा क्षण. . वहिनी–भाऊ. .मी पुन्हा हाक द्यायला शरमलो. घडीभर एकीकडे थांबलो. नंतर हळूच दार हलवलं. पण बाहेरून कडी लागलेली दिसली. मला नवलच वाटलं. शंका आली. . .यावेळी कधी कुठे तर जायचे नाही. आज. .पुन्हा वाटलं की आनंदित झालेली—पोरंबाळं घेऊन सगळे सेकंड 'शो'ला गेले असतील. जाऊ देत. एरव्ही रोजच्या रडगाण्यात कुठे फुरसद मिळते ? .आजचा आनंद वेगळाच ! तो मोकळे-पणानं —स्वतंत्रपणानं उपभोगायलाच पाहिजे. . .तरी सहज विचारून पहावं म्हणून मी शेजारच्या म्हाताऱ्या पामा मामाला हाक दिली. . .जराशानं तो जवळ आला. घोगऱ्या आवजांत अडखळत सांगितलं—

"माधवा, आरं—ल-इऽ वंगाळ झा-लया. मंगाशी कुनीतरी येऊन. . .तुज्या वयनीपाशी. वयनीपाशी बोललं का, तुज्या भावाचं का-कायतरी इपरीत घडलाय् म्हून. .म्हादू, रंगू, सोमी बिमीला घेऊन तुजी वयनी मंगापास्नं गेली हाय. "

मी कोलमडलोच. 'दादा ऽऽ' म्हणून किलोरी मारत—धावत–ओरडतच वस्तीतल्या चौकात गेलो. अजूनपर्यंत रेकचंद भैयाचा पानठेला चालूच होता. . .तो तो ऐलेलं सांगू लागला. .—आणि इतक्यात समोरून पोरांना धरून वहिनी रडत–बोंबलतच येत होती. मला बघून गयवरून उटली—

"रंजीस आला—जीव सारला होऽऽ तुमच्या भावानं. .आखरी सारलाऽच ! .आरे रे देवाऽ .माझा राजा कटून मेला ! राई राई झाला. पत्ता लागला नाही. . .आ. .हा. .हा.ऽऽ. .माझा राऽजा .!"

माझं रक्त आतल्या आत गोठून गेल्याचा भास झाला. मी निर्जीव डोळ्याने वहिनीचा. .पोरांचा कलकलाट बघतच राहिलो. डोळ्यापुढे अंधाराचा अतिदाट थर थरारला, जाड जाड होत गेला. . .आणि—माझ्या दुभंगलेल्या मनांत अफाट आक्रोश उफाळून आला. .त्याला काही अंतच नव्हता !

प्रतिष्ठान गेल्या २५ वर्षांची अव्याहत वाटचाल.
प्रतिष्ठान वाङ्मयीनदृष्टचा मोलाचे कार्य.

प्रतिष्ठान, जानेवारी १९७८, काही लेखक,
लक्ष्मीकांत तांबोळी, शंकर रामाणी, रमेश दीक्षित,
ब्रह्मानंद देशपांडे, महावीर जोंधळे, कृष्णा हरिदास,
सौ. अनुराधा पाटील.

'प्रतिष्ठान'ला आपल्या सहकार्याची गरज आहे.
वार्षिक वर्गणी रु. १० /- पाठवून 'प्रतिष्ठान'च्या वाटचालीत सहभागी व्हा.

प्रतिष्ठान,
मराठवाडा साहित्य परिषद,
सन्मित्र कॉलनी,
औरंगाबाद — ४३१००१.

प्रतिष्ठान मराठी नियतकालिकांच्या इतिहासातील महत्वाचे पान.
प्रतिष्ठान साहित्यविषयक सुजाण दृष्टी.



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

## माडगूळकरांची शेवटची कविता

कोवळ्या रोपट्या आज तू पाहुणा
भूषवी अंगणी येऊनीया ।
माणसाची प्रीती घेई रे संगाती
मानाचा अतिथी आमुचा तू ।
श्यामसुंदराच्या देहुड्या ढंगात
येई या घरात आनंदाने ।
आनंदाचा नाद मंजुळ संगीत
शाखापल्लवात घेऊनी ये ।
कोवळ्या पानात तुझिया नवीन
सूर्याचे किरण नाचू देत ।
वनाचा वल्लभ नाचरा आहे वारा
देई उपहारा गीताचा त्यां ।
वर्षतो श्रावण आशीर्वाद त्याचा
मुकुट माथीचा होवो तुज ।
इंद्रपुरीतून धारा वर्षताती
पडू दे त्या माथी पानांवर !

—ग. दि. माडगूळकर

## सतीश काळसेकर / पांगारा

सवंध रात्र अंगावर भरघोस चांदणे पांघरून
येणाऱ्या सकाळी
समोर पहावे तर डोळ्यांसमोर
अेकाकी पांगाऱ्यावर आग उसळत असते
खाली पसरलेल्या घरांच्या
कौलांनी, सिमेंटच्या पत्र्यांनी, साअिनबोर्ड्सनी
आणि कशाकशानी
शाकारलेल्या छपरांवर दिसतात भिरभिरताना
पांगाऱ्याचे डोळे.
तेव्हा मी विचार करतो
पांगाऱ्याचा, छपरांचा, फुलांचा
आणि त्या खाली कशी
माणसे जगतात
पांगाऱ्यासारखी
याचाही.

## विजया त्र्यं. देशपांडे / राखेची फुले

खूप हौशीने तिनें
फुलझाडांची कलमं लावली,
रोज पाणी टाकायची
अन् फुलांची वाट बघायची.
अगदी बारीक कोंब दिसला
तरी आशेने बघायची.
पण ते झाड
फक्त पानांचेच निघाले !
शेवटी तिने
पाणी घालणे सोडून दिले
.....उन्हात करपून झाड
वाळून गेले.
पानेसुद्धा दिसेनाशी झाली
उरली होती जमिनीत
रोवलेली वाळकी काडी
काटे जपून ठेवलेली !
मग तिने वाळक्या काडीचे
तुकडे केले.
अन् आगपेटीची काडी लावून दिली.
आता कधी कधी ती
भरल्या डोळ्यांतून हसते
तिच्या झाडाला
राखेची फुले आली म्हणून !!



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

## विदर्भ साहित्य संघ

# कार्यवृत्त (दि. १ नोव्हेंबर, १९७७ ते १८ डिसेंबर, १९७७)

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. कार्यालय व्यवस्थापन

१.१. प्रकृती नीट रहात नाही म्हणून डॉ. वा. वि. मिराशी (विश्वस्त) ह्यांनी पदाचा राजीनामा दिला व त्यांच्या जागी दि. २०-७-७७ च्या विश्वस्तांच्या सभेत डॉ. वामन शिवराम वारलिंगे ह्यांची निवड व नेमणूक झाली.

१.२. दि. ११-१२-७७ ला केंद्रीय कार्यालयात झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेत पांढरकवडा व नागभीड येथील शाखांना मान्यता देण्यात आली.

१.३. "समग्र वजावा प्रधान" आणि डॉ. र. श. केळकरांनी "गणेश व्याख्यान मालेत" दिलेली व्याख्याने मुद्रित करण्यासाठी साहित्य संस्कृति मंडळाकडून अनुदान मिळविण्याचा प्रयत्न करावा असे ठरले.

२. ह्या कालावधीत झालेले आजीव सभासद

(१) डॉ. कुळकर्णी, द. भि., नागपूर; (२) सौ. वारलिंगे, पद्माताई, नागपूर; (३) मेजर बारलिंगे, पद्माकर वामन, नागपूर; (४) श्री. हरदास, विजय गोविंदराव, चंद्रपूर; (५) श्री. पुराणिक, वासुदेव वामनराव, चंद्रपूर; (६) श्री. कामडे, जी. एस्., चंद्रपूर; (७) प्रा. मेघे, राम कृष्णराव, अमरावती; (८) सौ. दुरगकर, चेतना कमलाकर, नागपूर; (९) प्रा. फणसाळकर, जनार्दन रामचंद्र, नागपूर; (१०) नामदार श्री. नाईक, सुधाकरराव सुर्जसिंगराव, पुसद.

३. मराठी साहित्य महामंडळाची दि. १७-११-७७ ला पुणे येथे सभा झाली. वि. सा. संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

४. सांस्कृतिक कार्यक्रम :

४.१. न्या. मू. रानडे आंतर-महाविद्यालयीन वादस्पर्धेच्या विजेत्यांना दि. २-११-७७ ला आमदार ग. प्र. प्रधान ह्यांच्या हस्ते बक्षीस-वितरण झाले.

४.२. ७-११-७७ ला श्री. निरंजन उजगरे ह्यांचे काव्यवाचन व चर्चा.

४.३. प्रा. म. ना. लोही ह्यांच्या अध्यक्षतेखाली दि. १९-११-७७ ला कै. वि. रा. हंबर्डे ह्यांचा १४ वा स्मृतिदिन साजरा झाला. सर्वश्री नाना रेटर, कुमारील भागवत व अविनाश किन्हीकर ह्यांची भाषणे झाली.

४.४. १९७७-७८ ची "गणेश व्याख्यानमाला" २५, २६, २७ नोव्हेंबरला साहित्य अकादमी, नवी दिल्लीचे कार्यवाह डॉ. र. श. केळकर ह्यांनी गुंफली. व्याख्यानांचे विषय होते (१) साहित्य आणि अध्यात्म, (२) आशियातील रामायण-परंपरा, (३) मराठी आणि हिंदीचे कृष्ण-काव्य.

४.५. शुक्रवार दि. २-१२-७७ ला महिला विभागातर्फे कथा कथनाचा कार्यक्रम झाला. यात डॉ. सौ. पद्मावती येरगावकर, सौ. सुनीती आफळे, सौ. मालती दामले, सौ. जयश्री रुईकर व सौ. वर्षा रेगे ह्यांनी भाग घेतला. कार्यक्रमाचे संचालन सौ. वर्षा रेगे यांनी केले. अध्यक्षस्थानी संघाध्यक्ष डॉ. आष्टीकर होते.



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

५. संगीत सभा

संगीत अलंकार स्वर्गीय पं. शंकरराव सप्रे ह्यांच्या पुण्यस्मृतीनिमित्त नाट्यनिपुण स्वर सम्राज्ञी कु. कीर्ती शिलेदार ह्यांच्या शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम सोमवार दि. १२–१२–७७ ला झाला.

६. चित्रकला

विदर्भ साहित्य संघाच्या सहकार्याने स्कल्पटर्स फोरम ऑफ इंडिया या संस्थेतर्फे शिल्पकला प्रदर्शन दि. ४–१२–७७ ला आयोजित करण्यात आले. उद्घाटन नागपूरचे महापौर श्री. अटलबहादूरसिंग यांनी केले. श्री. दीपक कन्नल या कलाकाराचा गौरव करण्यात आला. हे प्रदर्शन ११–१२–७७ पर्यंत भरले होते.

७. नाट्य समिती :

७.१. दि. १ नोव्हेंबर १९७७ ला सुप्रसिद्ध नट-नाटककार व दिग्दर्शक प्रा. मधुकर तोडरमल व सिने नट श्री. अरुण सरनाईक यांनी भेट दिली. त्यांच्याशी नाट्य चर्चा झाली.

७.२. दि. ४ नोव्हेंबरला बालनाट्य स्पर्धेचे पारितोषिक वितरण श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) ह्यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी डॉ. मधुकर आष्टीकर होते. बक्षीसांच्या रकमेत वाढ व्हावी ह्या दृष्टीने खालील व्यक्तींनी देणग्या दिल्या :—

(१) श्री. रंजन दारव्हेकर रु. १०१–००, (२) प्रा. ज. रा. फणसाळकर रु. ५१–००, (३) श्री. मधुसूदन वेलणकर रु. २१–००. संस्था त्यांची ऋणी आहे.

७.३. वि. सा. संघातर्फे दि. ५–११–७७ ला मराठी रंगभूमीदिन साजरा झाला. श्री. शरद सुतवणे व सौ. कल्याणी देशमुख ह्यांनी मराठी नाट्यगीते सादर केली. तदनंतर मराठी नाट्य परिषदेच्या संमेलनाचे नियोजित अध्यक्ष श्री. पु. व्यं. दारव्हेकर ह्यांचा सत्कार करण्यात आला. श्री. वामनराव चोरघडे प्रमुख अतिथी होते. न्या. मू. धर्माधिकारी, अॅड. चं. माडखोलकर, श्री. रमेश अंभईकर व डॉ. द. भि. कुळकर्णी ह्यांची गौरवपर भाषणे झाली. श्री. दारव्हेकरांना देण्यात आलेली १,१११-०० रु. ची थैली त्यांनी वि. सा. संघाला दिली व त्यात इष्ट ती भर घालून कै. कु. छाया दुपल्लीवार व कै. बाळ डांगरे ह्यांचे स्मृतीप्रित्यर्थ १०१-०० रु. ची अभिनयाबद्दल पारितोषिके द्यावीत अशी वि. सा. संघाध्यक्षांना विनंती केली. डॉ. आष्टीकर ह्यांनी ते मान्य केले.

८. स्मृतिदिन

८.१. दि. २७–११–७७ ला कै. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या छायाचित्राला डॉ. र. श. केळकर यांनी पुष्पमाला अर्पण केली.

८.२. प्रथम पुण्यतिथीनिमित्त दि. २८–११–७७ ला डॉ. सुनील सुभेदार, प्रा. म. ना. लोही, प्रा. भा. नंदनवार, प्रा. प्र. उर्ध्वरेषे, प्रभाकर व श्री. वसंत वरखेडकर यांची भाषणे झाली.

८.३. दि. ६ डिसेंबर १९७७ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुण्यतिथीनिमित्त पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

९. सत्कार

दि. १२–१२–७७ ला श्री. आत्माराम रावजी देशपांडे उपाख्य कवी अनिल यांना त्यांच्या "दशपदी" ह्या काव्य संग्रहाला, साहित्य अकादमीचे बक्षीस मिळाल्याबद्दल डॉ. वा. शि. बारलिंगे, विश्वस्त, वि. सा. संघ ह्यांच्या हस्ते सत्कार केला. डॉ. वि. बा. प्रभुदेसाई यांनी गौरवपर भाषण केले.

१०. शोकसभा

आधुनिक युगाचे थोर महाकवी श्री. गजानन दिगंबर माडगूळकर ह्यांचे दि. १४–१२–७७ ला पुणे मुक्कामी निधन झाले. त्या प्रीत्यर्थ वि. सा. संघातर्फे दि. १६–१२–७७ ला प्रकट शोकसभा आयोजित करण्यात आली. श्री. गो. स. देहाडराय यांनी प्रास्तविक भाषण केल्यावर संघाध्यक्ष डॉ. आष्टीकर यांनी



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

छायाचित्राला पुष्पमाला अर्पण केली. श्री. राजाभाऊ कानगो यांनी त्यांचे नुकतेच प्रसिद्ध झालेले गीत गान केले. नंतर डॉ. वसंत वऱ्हाडपांडे, डॉ. आशा सावदेकर, डॉ. सूर्यकांत खांडेकर, डॉ. भाऊसाहेब कोलते, श्री. आ. रा. देशपांडे, श्री. ज्ञानेश्वर साधु, प्रा. म. ना. लोही यांची भाषणे झाली. डॉ. आष्टीकर यांनी आपले भाषण केल्यावर ठराव वाचून दाखविला. उपस्थितांनी २ मिनिटे उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.

११ परीक्षा समिती

११.१ मराठी प्राज्ञ या शासकीय उच्चस्तर परीक्षांचे वर्ग चालविण्यात प्रा. श्री. भा. य. लांबे आणि श्री. हरिहरराव येगावकर यांनी सहकार्य केले. या वर्गात १० शासकीय विद्यार्थी होते व तीन महिन्यांकरिता हे वर्ग चालविण्यात आले.

११.२. दि. ३०–१०–७७ ला माजी कुलगुरू डॉ. वि. भि. कोलते ह्यांच्या हस्ते गत सत्रातील परीक्षार्थींना प्रमाणपत्रे व बक्षीस वितरण समारंभ झाला.

११.३. आगामी परीक्षा दि. ४ व ५ फेब्रुवारी, ७८ ला होतील. दि. २५ जानेवारी, ७८ पर्यंत केंद्राधिकाऱ्यांकडे प्रवेशपत्रे व परीक्षा साहित्य पाठविले जाईल. केंद्र व्यवस्थापकांनी दि. ६ फेब्रुवारी, ७८ पर्यंत परीक्षा साहित्य केंद्र कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक आहे, असे संचालक, परीक्षा समिती प्रा. माणिकराव बेंतुले यांची व्यवस्थापकांना आग्रहाची सूचना आहे.

१२. श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय

दि. १८–१२–७७ ला विदर्भातील नवप्रकाशित साहित्य-कलाकृतींचा परिचय करून देण्याच्या दृष्टीने "आस्वाद" हा कार्यक्रम झाला. यात श्री. रमेश कांवळे, डॉ. सौ. आशा सावदेकर, श्री. दत्तानंद इंगोले व सौ. शुभांगी संत यांनी भाग घेतला.

१३. शाखावृत्त

१३ १. परतवाडा शाखे सभेतर्फे दि. १–१२–७७ ला वैदर्भीय कवी श्री. बाबा मोहोड यांचे मार्गदर्शनाखाली काव्य वाचनाचा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी सौ. मृणालिनी देशपांडे होत्या. पाहुण्यांचा परिचय श्री. रामदास उघडे यांनी केला. सौ. सालिनी चिचवडकर, सौ. काणे, सौ. घाटे, कु. वीणा खेरडे, सौ. ताराबाई बर्वे, श्री. अण्णाजी पार्डीकर व श्री. शशीकांत बर्वे यांनी भाग घेतला. श्री. वोंडे यांनी आभार प्रदर्शन केले. दि. ४–१२–७७ ला "दक्षिणेकडील सहल" या विषयावर सौ. वीणाताई देशमुख यांचे भाषण झाले.

१३.२. पांढरकवडा शाखा

खालील अस्थायी पदाधिकाऱ्यांची निवड दि. २२–१०–७७ ला झाली. अध्यक्ष प्रा. श्रीकांत बापुरावजी होटे, कार्यकारी अध्यक्ष प्रा. सौ. लीला हरिश्चंद्र भेले, उपाध्यक्ष प्रा. दादाराव तानबाजी मनगटे, सचिव श्री. हलिश्चंद्र माधवजी भेले, कोषाध्यक्ष श्री. मनोहर गणपतराव पटले, सहसचिव श्री. रमेश गणपतराव मंथनवार. सदस्य:—(१) प्रा. बापुराव गोविंदराव भोंड, (२) प्रा. भाऊराव माधवजी भेले, (३) श्री. मनोहर गोविंदराव देशमुख, (४) श्री. सुरेन्द्र हरिभाऊ भलाकर, (५) कु. माया सावापुर, (६) श्री. जयंत नथ्थुजी मतकर, (७) श्री. अशोक लक्ष्मणराव हिकट्टे, (८) श्री. विजय वसंतराव चौधरी.

१३.३. नागभीड शाखा

दि. ४–१२–७७ ला खालील पदाधिकाऱ्यांची निवड झाली :—अध्यक्ष—श्री. वा. ना. विगम, उपाध्यक्ष—श्री. ना. ति. येसनसुटे, कार्यवाह—श्री. रा. प. जयस्वाल, सहकार्यवाह—श्री. मा. पां. गोंगल, कोषाध्यक्ष—श्री. म. नं. कापगाते, सदस्य—(१) सौ. व. ग. रुद्रकर, (२) श्री. यु. ल. शेंडे, (३) श्री. प्र. वि. कावळे, (४) श्री. दा. बा. पोहेकर, (५) श्री. प. के. गजपुरे, (६) श्री. क. गो. नरड.



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

१३.४. भंडारा

दि. १५ डिसेंबर रोजी सभा होऊन गीत रामायणकार ग. दि. माडगूळकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

१३.५. ब्रह्मपुरी

दि. १८-१२-७७ रोजी वि. सा. संघाचे सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय ह्यांचे प्रमुख उपस्थितीत ब्रह्मपुरी शाखेची सर्वसाधारण सभा होऊन, त्यांत कार्यकारिणीची निवड करण्यात आली. ती येणे प्रमाणे-अध्यक्ष-श्री. वसंत भाई, उपाध्यक्ष- (१) अॅड. वसंत भुसारी, (२) प्रा. के. के. मेश्राम, सचिव- प्रा. नरेंद्र पोफळी, सहसचिव--प्रा. देवीदास जगनाडे, कोषाध्यक्ष--श्री. रा. शं. पंडे. इतर सभासद--(१) श्री. गोपाळराव शिनाखेडे, (२) श्री. राजाभाऊ भट, ३) प्रा. अ. रा. नगरकर, (४) प्रा. वसंत पाटणकर, (५) प्रा. गणवीर, (६) श्री. कुंभारे, (७) श्री. मनोहर शिनखेडे, (८) सौ. सुधा भुसारी, (९) प्रा. सौ. मंजू बजाज. त्याच सभेत श्री. आत्माराम रावजी देशपांडे कवि "अनिल" यांना त्यांच्या "दशपदी" ह्या काव्य संग्रहाला साहित्य अकादमीचे परितोपिक मिळाल्याबद्दल अभिनंदन करणारा ठराव संमत झाला. सुरुवातीला कै. ग. दि. माडगूळकर ह्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. श्री. मारोतराव कांवळे वि. सा. संघाचे आजीव सभासद झाले.

इतर शाखासभांचे वृत्तांत अद्यापपर्यंत हाती आलेले नाहीत.

संदर्भ ग्रंथालय विदर्भ साहित्य संघ

# साभार पोच

**प्रकाशक :—पॉप्युलर प्रकाशन, ३५—सी, ताडदेव रोड, मुंबई, ४०००३४.**

(१) **उत्खनन (कविता)**
कवी—केशव मेश्राम, पृ. ८८. मूल्य रु. ८

(२) **कल्याणी (नाटक)**
ले.—जोत्स्ना देवधर, पृ. ५६. मूल्य रु. ४

(३) **झेंडे-पाटील महाविद्यालयात गंगू-अंबू-विठा (एकांकिका)** ले.—प्रा. वसंत कानेटकर, पृ. ३१. मूल्य रु. ३

(४) **मेघदूत (काव्य)**
अनुवादक—कुसुमाग्रज, पृ. ६८. मूल्य रु. ५

(५) **पार्थिवतेचे उदयास्त (समीक्षा)**
ले.—डॉ. द. भि. कुळकर्णी, पृ. ६८. मूल्य रु. ९

(६) **राजा ईडिपस (नाटक)**
अनुवादक—सदानंद रेगे, पृ. ७४. मूल्य रु. ६

(७) **वाङ्मयीन आकलन (समीक्षा)**
ले.—रा. ग. जाधव, पृ. १११. मूल्य रु. १०

(८) **राजकीय चळवळ आणि मराठी नाट्यसृष्टी (प्रबंध)** ले.—ना. कृ. शनवारे, पृ. २६०. मूल्य रु. २०

(९) **डॉ. बाबासाहेब आंबेडकर (चरित्र)**
ले.—धनंजय कीर, पृ. ५५८. मूल्य रु. ३०

(१०) **त्रिशूळ (कविता)**
कवी—बाबुलनाथ, प्रकाशक- काळे ब्रदर्स पब्लिकेशन, ६०, सोमवार पेठ, पुणे, ११, पृ. ३६. मूल्य रु. २

(११) **हसुभाषिते**
ले.—सुभाषचंद्र विष्णू देसाई, प्रकाशक— आनंदाश्रम सोसायटी, पुणे-११. पृ. १४०. मूल्य रु. १०

(१२) **महात्मा गांधीजी : व्यक्तिमत्व, कार्य व शिकणव** ले.—प्रा. प्र. रा. दामले, प्रकाशक— शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. पृ. ४९. मूल्य रु. ३

**प्रकाशक :—विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, सीताबर्डी, नागपूर, १२.**

(१३) **मीच लाविली चूड (कादंबरी)**
ले.—प्रभाकर अत्रे, पृ. १५१. मूल्य रु. १२

(१४) **प्रेमाय तस्मै नमः (कादंबरी)**
ले.—श्रीधर दीक्षित, पृ. ९४. मूल्य रु. ८

(१५) **दिग्या (कादंबरी) आ. ३ री**
ले.—बा. द. सातोस्कर, पृ. १४९. मूल्य रु. १०

(१६) **त्रिदल (कादंबरी)**
ले.—रमेश कालगूणकर, पृ. १०३. मूल्य रु. ८

(१७) **जनता-जनार्दनाचे अध्यात्म**
लेखक व प्रकाशक—हणमंत श्रीनिवास देशपांडे, इंदापूर, जिल्हा-पुणे, पृ. २५२. मूल्य रु. १५



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाच्या
परीक्षा प्रमाणपत्र
वितरण-समारंभप्रसंगी.
डॉ. वि. भि. कोलते.





कविवर्य कै. दु. आ. तिवारी
ह्यांचा स्मृतिदिन-समारंभ.
नामदार बाळासाहेब चौधरी
भाषण देताना (दि. ३१-१०-७७)

संगीत अलंकार स्वर्गीय
पं. शंकरराव सप्रे
स्मृतिदिन.
कु. कीर्ती शिलेदार
यांचे
शास्त्रीय गायन.





मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल' यांना साहित्य अकादमीचे पारितोषिक प्राप्त झाल्याबद्दल
डॉ. वा. शि. वारलिंगे (विश्वस्त) सत्कार करताना

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ